CARNEGIE INDIA

WORKING PAPER

एप्रिल 2023

# तैवानच्या सामुद्रधुनीतील पुढच्या पेचप्रसंगाआधी भारताने काय करायला हवे?

विजय गोखले

CARNEGIE ENDOWMENT FOR INTERNATIONAL PEACE INDIA

# तैवानच्या सामुद्रधुनीतील पुढच्या पेचप्रसंगाआधी भारताने काय करायला हवे?

विजय गोखले

या वर्किंग पेपरचा अनुवाद पूनम छत्रे यांनी केला आहे.

© 2023 Carnegie Endowment for International Peace India. All rights reserved.

Carnegie does not take institutional positions on public policy issues; the views represented herein are those of the author(s) and do not necessarily reflect the views of Carnegie, its staff, or its trustees.

No part of this publication may be reproduced or transmitted in any form or by any means without permission in writing from Carnegie India or the Carnegie Endowment for International Peace. Please direct inquiries to:

Carnegie Endowment for International Peace
Publications Department
1779 Massachusetts Avenue NW
Washington, D.C. 20036
P: + 1 202 483 7600
F: + 1 202 483 1840
CarnegieEndowment.org

Carnegie India
Unit C-5 & C-6, Edenpark,
Shaheed Jeet Singh Marg
New Delhi - 110016, India
P: + 011 4008687
CarnegieIndia.org

This publication can be downloaded at no cost at CarnegieIndia.org.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संक्षेप | 1 |
| विषयप्रवेश | 3 |
| तैवानच्या सामुद्रधुनीत होणाऱ्या संभाव्य संघर्षाचे भारतावर होणारे परिणाम | 5 |
| 1954-55 आणि 1958 च्या पेचप्रसंगांच्या काळात भारताचे तैवान धोरण | 9 |
| भविष्यात तैवानच्या सामुद्रधुनीत पेचप्रसंग निर्माण झाला, तर भारतासमोर असणारे पर्याय | 17 |
| तात्पर्य | 23 |
| लेखकाविषयी | 24 |
| टिपा | 26 |

# संक्षेप

पुढच्या दोन दशकांत हिंद-प्रशांत प्रदेशासाठी तैवान प्रश्नाचे महत्त्व वाढण्याची शक्यता आहे. तैवानला मुख्य प्रदेशाशी जोडण्यासाठी पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना (PRC) अधिकाधिक आक्रमक होत आहे आणि ते साध्य करण्यासाठी लष्करी क्षमता निर्माण करण्याचे त्याचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. सगळ्यात मोठी वैश्विक ताकद म्हणून स्थान मिळवायचे PRC चे प्रयत्न सुरू असताना, त्याचा एक हिस्सा त्याच्या नियंत्रणाबाहेर असणे त्याच्यासाठी असह्य आहे. हे नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करताना युनायटेड स्टेट्सकडून प्रत्युत्तर मिळण्याची शक्यता आहे, ज्याचे व्यापक परिणाम त्या प्रदेशाला आणि जगाला सोसावे लागतील.

युनायटेड स्टेट्सच्या दृष्टीने पाहिले, तर PRC ने यासाठी केलेले कोणतेही प्रयत्न त्याच्या प्रतिमेच्या आड येऊ शकतात. युनायटेड स्टेट्स स्वातंत्र्य आणि लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी संपूर्ण जगात प्रयत्नशील असतो, ही त्याची मुख्य धारणा आहे, त्याला धक्का बसून त्याची विश्वासार्हता कमी होऊ शकते. युनायटेड स्टेट्सच्या जागतिक सत्तेलाही त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात. या संदर्भातून बघताना, आणि तैवानचे स्थान दोन्ही देशांसाठी महत्त्वाचे असल्यामुळे, हा मुद्दा वेगाने गांभीर्य धारण करू शकतो आणि हिंद-प्रशांत प्रदेशासाठी चिंताजनक होऊ शकतो. 2022 साली रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतर संपूर्ण जगाच्या अर्थकारणाची जी पडझड झाली आहे, त्याहीपेक्षा मोठे संकट तैवानचा संघर्ष निर्माण करू शकतो. प्रत्यक्ष संघर्ष जरी झाला नाही, तरी तैवानवर चीनने टाकलेल्या दबावामुळे तैवानच्या सामुद्रधुनीतून जी जलवाहतूक होते आणि पाण्याखालून ज्या संदेशवाहिन्यांचे जाळे पसरलेले आहे त्यांचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते, ज्याचा गंभीर परिणाम आशियाच्या भू-राजकीय आणि भू-आर्थिक परिस्थितीवर होईल.

भारताचे या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर भू-राजकीय आणि भू-आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. शिवाय, पूर्व आणि आग्नेय आशियाबरोबर त्याचे दीर्घ संबंधही असल्यामुळे, भारताने या परिस्थितीवर सतत आणि बारीक लक्ष ठेवले पाहिजे. शिवाय, वेगवेगळ्या प्रकारच्या संकटांवर मात करण्याचे धोरण तयार करून ते राबवलेदेखील पाहिजे. तैवानच्या सामुद्रधुनीत जर मोठा पेचप्रसंग निर्माण झाला, तर भारत कोणते धोरण राबवू शकतो यावर हा लेख प्रकाश पाडायचा प्रयास करतो.

हा लेख तीन भागात लिहिलेला आहे. तैवानच्या सामुद्रधुनीत आणखी एखादा पेचप्रसंग निर्माण झाला, तर त्याच्या भू-राजकीय आणि भू-आर्थिक परिणामांचे विश्लेषण पहिल्या भागात करण्यात आलेले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा नेमका किती परिणाम होईल याची स्पष्ट आकडेवारी उपलब्ध नसली, तरीही हे स्पष्ट आहे, की अर्थव्यवस्थेतल्या प्रत्येक विभागावर त्याचा परिणाम होईल आणि तो आघात इतका मोठा असेल, की भारतीय अर्थव्यवस्था अनेक वर्ष मागे ढकलली जाईल. प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (Line of Actual Control – LAC) आणि हिंद महासागर या दोन्ही ठिकाणी चीन अधिकाधिक आक्रमक होत असताना असा संघर्ष उद्भवला, तर त्याचा परिणाम भारताच्या भू-राजकीय हितसबंधांवर आणि राष्ट्रीय सुरक्षेवरही होईल.

1954-55 आणि 1958 असा दोन वेळा तैवानच्या सामुद्रधुनीत पेचप्रसंग उद्भवला होता, तेव्हा भारताने त्या आपत्ती निवारणासाठी काहीच केले नव्हते, असा एक सर्वसाधारण समज आहे. त्यांना अनुक्रमे तैवानच्या सामुद्रधुनीचा पहिला आणि दुसरा पेचप्रसंग असे म्हणले जाते. लेखाचा दुसरा भाग याचेच विश्लेषण करतो. 1950 मध्ये PRC चा तैवानवरचा अधिकार मान्य केल्यानंतर भारतासाठी तैवान महत्त्वाचा राहिला नाही हा समज युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंग्डम आणि भारतातल्या संग्रहित साहित्याचे संदर्भ देऊन खोडून काढायचा प्रयत्न या लेखात केलेला आहे. भारताने केलेली पेचप्रसंगांची हाताळणी पाहून धोरण आखणी करताना काय धडे घ्यायला हवेत यावरही लेखात विचार केलेला आहे.

तिसऱ्या भागात भारत-तैवान संबंधांचा इतिहास आणि PRC ला आजच्या तारखेपर्यंत दिलेली राजनैतिक मान्यता यांचा मागोवा घेण्यात आलेला आहे. भारताच्या तैवान धोरणाचा आढावाही घेण्यात आलेला आहे. तैवानच्या सामुद्रधुनीत युद्ध होण्याची शक्यता फेटाळून न लावता, तसे झाले, तर भारतासमोर काय परिस्थिती असेल आणि त्यावर कशी प्रतिक्रिया देता येईल आणि त्यासाठी संभाव्य धोरणे काय असतील यावर ऊहापोह करण्यात आला आहे. युनायटेड स्टेट्स-चीन-तैवान या त्रिकोणावर बारिक नजर ठेवावी, तैवान सामुद्रधुनीच्या पेचप्रसंगाचा परिणाम संपूर्ण सरकारवर किती होईल याचे मूल्यमापन करावे आणि वेगवगेळी कोणती धोरणे राबवता येतील याचा अंदाज घ्यावा याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. चीन आणि युनायटेड स्टेट्सच्या भारताकडून काय अपेक्षा असतील याचे स्पष्ट चित्र काढून तैवान प्रश्नावर महत्त्वाच्या भागीदारांबरोबर सल्लामसलतही सुरू करावी असेही सुचवलेले आहे.

# विषयप्रवेश

पुढच्या दोन दशकांचा विचार करता, हिंद-प्रशांत प्रदेशासाठी तैवान प्रश्न अधिकाधिक महत्त्वाचा होत जाणार आहे. तैवानला मुख्य प्रदेशाशी जोडण्यासाठी पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना (PRC) अधिकाधिक आक्रमक होत आहे. चीनने लष्करी हालचाल केली, तर युनायटेड स्टेट्सकडून त्याला प्रत्युत्तर दिले जाईल आणि त्याचे व्यापक आंतरराष्ट्रीय परिणाम होतील. अमेरिकेतल्या सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक ऍन्ड इंटरनॅशनल स्टडीज (CSIS) ने तैवानविषयी चीन-अमेरिका यांच्यामध्ये जो संघर्ष सुरू आहे त्याचा अभ्यास केला, आणि त्याचे असे मत आहे, की अमेरिका आणि चीनमध्ये प्रत्यक्ष युद्ध होईल, असे वाटणेही एकेकाळी अशक्य होते; आणि आता राष्ट्रीय सुरक्षेच्या समूहात या बाबतीत अगदी सामान्यपणे चर्चा व्हायला लागलेली आहे.[1]

असेही म्हणले जाते, की या दोन सगळ्यात मोठ्या जागतिक महासत्तांचे आपापसात गुंतागुंतीचे संबंध आहेत आणि दोन्ही देश मोठ्या प्रमाणावर एकमेकांवर अवलंबून आहेत, त्यामुळे तैवानचे युद्ध अटळ आहे असे वाटत नाही, आणि ते होईल असेही वाटत नाही. पण पहिल्या महायुद्धात हेही दिसले होते, की एकमेकांवरचे अवलंबत्व आणि आपसांत कौटुंबिक बंध असले, तरीही युद्ध होतेच. आणि तैवान प्रश्न हा एखादा साधासुधा, न सुटलेला भू-राजकीय प्रश्न नाहीये. तो धोकादायक आहे, कारण चीन आणि युनायटेड स्टेट्स या दोन जागतिक महासत्तांची प्रतिष्ठा आणि हितसंबंध थेटपणे जिथे गुंतलेले आहेत, त्याच प्रदेशात हा प्रश्न निर्माण झालेला आहे. सगळ्यात मोठी वैश्विक ताकद म्हणून स्थान मिळवायचे PRC चे प्रयत्न सुरू असताना, तो स्वत:चा मानतो असा त्याचा एक हिस्सा त्याच्या नियंत्रणाबाहेर "स्वतंत्र" आहे, हे त्याच्यासाठी असह्य तर आहेच, पण ते राष्ट्रीय पातळीवर लाजिरवाणेदेखील आहे.[2] युनायटेड स्टेट्सच्या दृष्टीने, PRC ने जर तैवानवर जबरदस्तीने कब्जा मिळवला, तर स्वातंत्र्य आणि लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असणारा देश, अशी  संपूर्ण जगामध्ये त्याची जी प्रतिमा आहे, तिच्या मुळावरच घाव पडेल.[3] युनायटेड स्टेट्सच्या

जागतिक सत्तेलाही त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात. दोन्ही देशांसाठी असलेले तैवानचे महत्त्व पाहता, भारताच्या हिंद-प्रशांत भागासाठी ही एक धोकादायक स्थिती होऊ शकते.

2023 मध्ये झालेल्या म्युनिक सुरक्षा समितीच्या अहवालात असे लिहिलेले आहे की, “तैवानविरुद्ध कृती करण्याचा विशिष्ट कालावधी बीजिंगने निश्चित केला आहे का नाही, याबद्दल मतमतांतरे आहेत. तो कालावधी बदलला आहे का, त्या दृष्टीने आपल्या उद्दिष्टांची आखणी करून PLA ने स्वत:ची क्षमता वाढवली आहे का, यावर वेगवेगळे दृष्टीकोन असले, तरी एका बाबतीत बऱ्यापैकी एकमत आहे, की (प्रसंगी अमेरिकेचा विरोध सहन करून), 2027 पर्यंत तैवानवर यशस्वीपणे आक्रमण करण्याइतकी क्षमता बीजिंगकडे असेल.[4] 2021 मध्ये यु.एस.-चीन इकॉनॉमिक ॲन्ड सेक्युरिटी रिव्ह्यू कमिशनने अमेरिकेच्या कॉन्ग्रेसपुढे सादर केलेल्या वार्षिक अहवालात असा निष्कर्ष काढलेला होता, की PRC ची तैवानवर आक्रमण करण्यासाठी आवश्यक असलेली पूर्वतयारी करून झाली आहे, किंवा जवळपास पूर्ण होत आलेली आहे.[5] त्यामुळे, तैवानचा भविष्यकाळ हा त्या प्रदेशाचा मुख्य मुद्दा असेल आणि PRC आणि तैवानमध्ये संघर्ष होऊ देऊ नये हे प्रमुख आव्हान असेल. कारण तसे झाले, तर 2023 च्या म्युनिक सुरक्षा समितीच्या अहवालानुसार, युक्रेन युद्धानंतर जी जागतिक अर्थकारणाची पडझड झालेली आहे, त्यापेक्षाही कैक पटीने गंभीर परिणाम जगाला भोगावे लागतील.

युनायटेड स्टेट्स आणि PRC मध्ये प्रत्यक्ष संघर्ष जरी झाला नाही, तरी तैवानवर चीनने टाकलेल्या दबावामुळे तैवानच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते, ज्याचा गंभीर परिणाम आशियाच्या भू-राजकीय आणि भू-आर्थिक परिस्थितीवर होईल. इव्हान फिगेनबाउम आणि ॲडम झुबिन यांनी 2023 च्या फॉरेन अफेअर्समध्ये लिहिलेल्या लेखानुसार, चीनने तैवानवर आक्रमण केल्यानंतर पश्चिमेकडून आर्थिक कोंडी केली जाण्याचे प्रयत्न होणार नाहीत किंवा मुख्य देशांवर मर्यादित प्रमाणातच आर्थिक बंधने घातली जातील, असे बीजिंगने गृहित धरू नये.[6] त्याचप्रमाणे, पश्चिमेकडून आर्थिक बंधने घातली जातील या भीतीपोटी चीन तैवानवर आक्रमण करण्याचे टाळेल अशा भोळ्या समजात पश्चिमेनेही राहू नये. त्यामुळे, येत्या एका दशकात राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण हिंद-प्रशांत प्रदेशावर आणि तैवानच्या सामुद्रधुनीत होणाऱ्या घटनांवर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

भारतासारख्या मोठ्या आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या आशियायी देशाचे पूर्व आणि आग्नेय देशांशी जुने आणि दीर्घ संबंध आहेत. गेल्या काही दशकांमध्ये भारताने असोसिएशन ऑफ साऊथ इस्ट एशिअन नेशन्स (ASEAN), पूर्व-आशियायी देश, ऑस्ट्रेलिया आणि प्रशांत महासागरातल्या बेटीय देशांबरोबर घट्ट राजकीय संबंध प्रस्थापित केलेले आहेत. ASEAN-केंद्रित चळवळींमध्ये भारताचा मोठा आणि कृतीशील सहभाग आहे. शिवाय, हिंद महासागराचा उत्तरी भाग आणि प्रशांत महासागराचा पश्चिमी भाग यांतून जाणारे संदेशवहन यंत्रणेचे जे जाळे आहे, त्याला भारताकडून मोठ्या प्रमाणावर सुरक्षाही पुरवली जाते. अलीकडच्या काळात त्याने अनेक देशांबरोबर मुक्त व्यापारी करारही केले आहेत आणि भारताची अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा यांच्यावर प्रभाव टाकणारे व्यापक व्यापारी, गुंतवणूक आणि सांस्कृतिक हितसंबंध त्या प्रदेशात निर्माण केले आहेत. भारताच्या मोठ्या प्रमाणावरच्या भू-राजकीय आणि भू-आर्थिक हितसंबंधांमुळे या प्रश्नाकडे काळाजीपूर्वक आणि अविरत लक्ष दिले जाणे आवश्यकच आहे. कोणकोणती विविधांगी परिस्थिती उद्भवू शकते, याचा विचार करून, त्या दृष्टीने धोरण आखणी करून ते राबवलेही जायला हवे. तैवानच्या सामुद्रधुनीत मोठा पेचप्रसंग निर्माण झाला, तर भारताने कोणते संभाव्य धोरण राबवावे हे शोधणे हेही या लेखाचे उद्दिष्ट आहे.

तैवानच्या सामुद्रधुनीत आणखी एक पेचप्रसंग निर्माण झाला, तर त्याचे भारतावर कोणते भू-राजकीय आणि भू-आर्थिक परिणाम होतील याचा लेखाच्या पहिल्या भागात शोध घेतलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा नेमका किती परिणाम होईल याची स्पष्ट आकडेवारी उपलब्ध नसली, तरीही हे स्पष्ट आहे, की अर्थव्यवस्थेतल्या प्रत्येक विभागावर त्याचा परिणाम होईल आणि तो आघात इतका मोठा असेल, की भारतीय अर्थव्यवस्था अनेक वर्ष मागे ढकलली जाईल. जर तैवान आणि PRC परत एक झाले, तर भू-राजकीयदृष्ट्या भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर थेट आणि व्यापक प्रदेशीय संदर्भानेही मोठ्या प्रमाणावर परिणाम होईल. तैवानच्या सामुद्रधुनीत संघर्ष होणे किंवा तणाव असणे म्हणूनच भारताच्या हिताचे नाही. हिंद-प्रशांत प्रदेशातला महत्त्वाचा प्रादेशिक देश असल्यामुळे, तणाव कमी करणे आणि युद्ध टाळणे यासाठी भारताला अवश्य प्रयत्न करावे लागतील. संघर्ष टाळण्यासाठी भारताने प्रयत्न करावेत का, आणि त्यासाठी नेमकी कोणती भूमिका निभावावी याचा विचार धोरणकर्त्यांना करावा लागेल. त्याच

वेळेला, तैवानच्या सामुद्रधुनीत प्रचंड तणाव निर्माण झाला किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली, तर एकट्याने किंवा समविचारी देशांच्या सहयोगाने जी कृती करावी लागेल, तिचीही तयारी भारताला करून ठेवावी लागेल.

त्यानंतर, एक सार्वत्रिक समज असा आहे, की तैवानच्या सामुद्रधुनीत आधी तेव्हा तणावाचे प्रसंग निर्माण झाले होते, तेव्हा संकट व्यवस्थापन करण्यात भारताने कोणतीही भूमिका निभावली नव्हती. या आधीच्या पेचप्रसंगांच्या काळात भारताची परिस्थिती कशी होती याचा आढावा लेखाच्या दुसऱ्या भागात घेण्यात आला आहे. 1954-55 आणि 1958 च्या तैवान पेचप्रसंगांच्या काळात भारताचे भारताचे राजनैतिक संबंध कसे होते आणि त्याने काय कृती केली याचा आढावा घेण्यात आला आहे. 1950 मध्ये PRC चा तैवानवरचा अधिकार मान्य केल्यानंतर भारतासाठी तैवानचा विषय महत्त्वाचा राहिला नाही, हा लोकप्रिय समज भारतीय, ब्रिटिश आणि अमेरिकेतल्या संग्रहित साहित्याचा संदर्भ देऊन खोडून काढायचा प्रयत्न या लेखात केलेला आहे. उलटपक्षी, 1950 च्या संपूर्ण दशकात भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या आखणीत तैवानचा मुद्दा महत्त्वाचा होता आणि स्वत:च्या राष्ट्रीय सुरक्षेच्या हेतूने भारताने (कुओमिनतांगचा अपवाद वगळता) त्याच्या सर्व प्रमुख पक्षांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केलेले होते.

याआधी भारताने तैवानचा पेचप्रसंग कसा हाताळला होता, त्यातून धडा घेऊन भारताचे भविष्यातले धोरण आखता येईल. उपलब्ध असलेल्या आधीच्या नोंदींचे सर्वांगीण विश्लेषण केल्यानंतर हे स्पष्ट होते, की तैवानच्या सामुद्रधुनीत PRC आणि युनायटेड स्टेट्सच्या संभाव्य संघर्षाबद्दल भारताला गंभीर चिंता वाटत होती. त्यामुळेच भारत सरकारने दोन्ही बाजूंशी राजनैतिक स्तरावर पुढाकार घेऊन संबंध निर्माण केले. (कोरिया आणि व्हिएतनामच्या बरोबरीने) आशियामध्ये आणखी एक भडका उडू नये यासाठी भारत प्रयत्नशील होता. त्याने शांतता आणि स्थैर्य बिघडले असतेच पण दोन्ही देशांबरोबर असलेल्या भारतीय संबंधांनादेखील परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीकोनातून प्रतिकूल परिणाम भोगावे लागले असते; आणि स्वत:च्या सुरक्षा आणि विकासाच्या दृष्टीने ते अधिक महत्त्वाचे होते.

तैवानचे युद्ध अपरिहार्य नसले, तरी ते कधीच होणार नाही, असेही नाही, या गृहितकावर या लेखाचा तिसरा भाग आधारित आहे. त्यामुळे, येत्या दशकात तैवानच्या सामुद्रधुनीत कोणतीही परिस्थिती निर्माण झाली, तरी तिच्याशी दोन हात करता येतील अशी वेगवेगळ्या पद्धतीची धोरणे भारताला विकसित करावी लागतील. सर्व शिफारशींच्या कळीचा मुद्दा हा आहे, की तैवानच्या सामुद्रधुनीत आणखी एक पेचप्रसंग निर्माण झाला, तर त्याचा भारतावर, विशेषत: त्याच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल याचे संपूर्ण मूल्यमापन किंवा आरेखन सरकारी पातळीवरून तातडीने, आणखी वेळ न दडवता केले गेले पाहिजे. त्याचे जे निष्कर्ष येतील. त्यावर आधारित पुढे मग जोखीम कमी करण्याची योजना भारताला तयार करावी लागेल. त्याचबरोबर, राष्ट्रीय सुरक्षा धोरण आखणाऱ्या सर्व संस्थांना तैवानच्या सामुद्रधुनीतल्या परिस्थितीची व्यापक जाणीव करून देणेही आवश्यक आहे. नियमित लक्ष आणि सातत्याने केलेले मूल्यमापन यावर ते अवलंबून असेल. त्याचबरोबर, भारताने धोरण म्हणून सामान्य जनतेलाही संदेश द्यायला हवा, की स्वत:च्या राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भातून भारत देश राजनैतिक कृतींची आखणी करत आहे आणि वेळ पडल्यास त्या कृती प्रत्यक्षातही आणण्याची त्याची तयारी आहे.

# तैवानच्या सामुद्रधुनीत होणाऱ्या संभाव्य संघर्षाचे भारतावर होणारे परिणाम

तैवान प्रश्न हा अनेक दशकांसाठी पूर्व आशियात एक संभाव्य धोकादायक प्रश्न होता, पण युद्धाचा धोका आता खूप वाढला आहे. ऑगस्ट, 2022 मध्ये अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रझेंटेटिव्जच्या प्रवक्त्या, नॅन्सी पेलोसी यांनी तैवानला दिलेली भेट हा निर्णायक बिंदू ठरला. चीनने त्यानंतर आक्रमक लष्करी पावले उचलली. अमेरिकेच्या 2023 च्या नॅशनल डिफेन्स ऑथोरायझेशन कायद्यात (NDAA) तैवानच्या संरक्षण क्षमतांना बळ देणे आणि तैवानशी राजनैतिक संबंध वाढवणे यांचा समावेश केलेला आहे. अमेरिका-चीन यांच्यातल्या संबंधांच्या रचनेत आज जी समस्या आहे,

त्याची लक्षणेच यातून दिसतात. सध्याचे चीन-अमेरिका संबंध आणि त्यांचे 1950 मधले संबंध यात काही समान वैशिष्ट्ये आहेत. अलीकडच्या काळात केलेल्या एका अभ्यासानुसार, तैवानचे हत्यार वापरून अमेरिका परत एकदा चीनला कमकुवत करून त्याचे विभाजन करायचा प्रयत्न करत आहे, असे चीनला वाटत आहे. तैवानमधले अंतर्गत राजकीय कल (तैवानच्या स्वतंत्र ओळखीसाठी ठाम असणे) चीनच्या चिंता वाढवत आहेत. अमेरिकेच्या दृष्टीने पाहिले, तर धोका पतकरायला तयार असलेल्या नेत्याच्या नेतृत्वाखाली (आधी माओ झेडॉन्ग आणि आता शी जिनपिंग) चीन परत एकदा तैवानच्या सामुद्रधुनीत अमेरिकेशी दोन हात करायला तयार आहे; यातून वॉशिंग्टनला असा संकेत मिळतो, की प्रशांत महासागराच्या पश्चिम भागात अमेरिकेला कमकुवत करण्यासाठी चीन तैवानवर कब्जा करायला तयार आहे, आणि तसे करून चीन अमेरिकेच्या दोस्त राष्ट्रांमध्ये दुफळी निर्माण करू शकतो.[7] त्यामुळे, तैवानची सामुद्रधुनी हा दोन्ही देशांसाठी अस्तित्वाचा प्रश्न झालेला आहे.

दोन्ही देशांसाठी तैवान हे "महान सत्ते" चे प्रतीक आहे. PRC च्या दृष्टीने, तैवान मुख्य राज्याशी परत एकदा संलग्न झाला की विदेशी सत्तांकडून चीनची जी मानहानी होते, त्याचा सांकेतिक शेवट होईल आणि हिंद-प्रशांत प्रदेशात चिनी शतकाची खऱ्या अर्थाने सुरुवात होईल. युनायटेड स्टेट्सच्या दृष्टीने तैवानचे स्वतंत्र अस्तित्व टिकून राहणे म्हणजे हुकूमशाहीच्या विरोधात लोकशाही मार्गाने लढा देत राहण्याचे प्रतीक आणि त्याद्वारे मुक्त जगाचा नेता म्हणून अमेरिकेचा वैश्विक प्रभाव टिकून राहणे.

1950 च्या स्थितीत आणि आजच्या परिस्थितीत अनेक मूलभूत फरक पडलेले आहेत. सर्वप्रथम, दोघांच्याही सर्वसमावेशक राष्ट्रीय ताकदीमधल्या भिन्नतेची दरी खूप अरुंद झालेली आहे.[8] दुसरे म्हणजे, त्यांचे आपसांतले आर्थिक संबंध खोल आणि गुंतागुंतीचे आहेत. तिसरे म्हणजे, मुख्य प्रदेशाशी संलग्न होण्याच्या चिआंग काइ-शेकच्या स्वप्नापासून तैवाननेच फारकत घेतलेली आहे. या कारणांमुळे धोरणात्मक तज्ज्ञांच्या आणखी एखाद्या समूहाने युनायटेड स्टेट्ससमोर ही वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे, की त्याने बीजिंगच्या हेतूंच्या मागचे वेगवेगळे पदर समजून घेतले पाहिजेत आणि शी जिनपिंग यांना तैवानवर आक्रमण करायचे आहे, असे गृहितच धरून चालणे इष्ट होणार नाही.[9] पण तैवानशी निगडित चीनचे खरे हेतू काय आहेत, याबद्दलदेखील काहीही स्पष्टता नाहीये. चीनने धोरणात्मक पातळीवर अस्पष्टता कायम ठेवलेली आहे पुन्हा एकदा एकीकरण घडवून आणण्यासाठी बळाचा वापर करणे या तत्त्वाशी त्याने कधी फारकतही घेतलेली नाही.

रशिया-युक्रेन युद्धामुळे चीन अशा निष्कर्षापर्यंत पोचू शकतो, की (PRC साठी जसा आहे, तसा) तैवान प्रश्न हा अमेरिकेसाठी काही अस्तित्वाचा प्रश्न नसल्यामुळे, वॉशिंग्टन तिथे थेट लष्करी कारवाई करणार नाही, आणि म्हणूनच तैवानवर चढाई करण्याची संधी आहे, असा विचार PRC करू शकतो. असा विचार करणे अतिशय चुकीचे ठरेल, कारण युनायटेड स्टेट्सला युक्रेनपेक्षा तैवानचे महत्त्व कैक पट अधिक आहे. PRC ने तैवानवर कब्जा केला, तर प्रशांत महासागराच्या पश्चिम प्रदेशातला समतोल बिघडेल, "फर्स्ट आयलंड चेन"चा वेढा त्यामुळे विस्कळीत होईल आणि हिंद-प्रशांत प्रदेशातले अमेरिकेचे महत्त्व संपुष्टात येईल. चीन जर असे गृहित धरत असेल, की त्याचा तैवानवर कायदेशीर हक्क आहे आणि बहुतांश देशांनी तो हक्क मान्य केलेला असल्यामुळे अमेरिका थेट हस्तक्षेप करण्याचे टाळेल, तर या तीन कारणांमुळे ते गृहितक चुकीचे ठरेल.

युनायटेड स्टेट्सकडून एकीकरणात अडथळे आणला जाईल याची चीनला जी चिंता वाटत असते, त्याचे उत्तर म्हणून जर चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी (PLA) ने नुकत्याच केलेल्या आधुनिकीकरणाकडे पाहिले, तर असे संकेत दिसतात, की तैवान आणि चीनच्या एकत्रीकरणाचे खूप जुने उद्दिष्ट साध्य करण्याच्या अशा काही हालचाली करण्याचा विचार PRC करू शकेल, जेणेकरून लवकरात लवकर ते उद्दिष्ट पूर्ण होईल. तैवानवर हल्ला करायचा प्रयत्न झाला, तर अमेरिका आवश्यक ते लष्करी साहाय्य करेल अशी विधाने अमेरिकेचे अध्यक्ष, जो बायडेन[10] आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, जेक सलिव्हन[11] यांनी केल्यावर चीनचा संताप झाला आहे, पण त्यामुळे चीनचे आपल्या वक्तव्यांमधली धार काही कमी केलेली नाही. 28 जुलै, 2022 रोजी जो बायडेन यांच्याशी टेलिफोनवर संवाद साधताना शी यांनी अमेरिकेने "साफ दृष्टी" ठेवावी, असे सांगितले आणि, "आगीशी जे खेळतात, त्यांचा विनाश होतो"[12], असा इशाराही दिला. बीजिंगमध्ये 7 मार्च, 2023 रोजी झालेल्या चौदाव्या नॅशनल पीपल्स कॉन्ग्रेसच्या पहिल्या सभेच्या पत्रकार परिषदेत चीनचे परराष्ट्र मंत्री किन गॅन्ग, तैवानचे वर्णन करताना म्हणाले, की "चीन-अमेरिका संबंधांकडून त्या लाल रेषेचे उल्लंघन होता कामा नये."[13] हिंद-प्रशांत प्रदेशात अमेरिकेने त्याचे संबंध दृढ करायचा प्रयत्न केलेला आहे आणि नवीन भागीदाऱ्याही अस्तित्वात आणल्या आहेत. चीन हा मुद्दा रेटत राहील अशी चिंता वाटून अमेरिकेने संबंध वाढवण्याचा प्रयत्न केला आहे असे संकेत दिसत आहेत. त्यामुळे, बेट

बळकावण्याच्या चीनच्या क्षमतेला टक्कर देण्यासाठी अमेरिका पावले उचलेल आणि तैवानची क्षमता वाढवण्यासाठी त्याला बळ देईल, अशी शक्यता आहे. अमेरिकेतला धोरणकर्ता समूह आणि वर्तुळांमध्ये या प्रश्नावर होणारी चर्चा बघता, आणखी एका (चौथ्या) संभाव्य तैवान सामुद्रधुनीतील पेचप्रसंगाची चर्चा मुख्य विचारधारेत समाविष्ट आहे, असे संकेत आहेत.

तैवानच्या सामुद्रधुनीतल्या संभाव्य चौथ्या पेचप्रसंगाची व्याप्ती आणि आकार यांचा अंदाज वर्तवणे अवघड आहे. वेगवेगळ्या प्रकाशनांनी विविध शक्यता व्यक्त केल्या आहेत, ज्यात थेट हल्ल्यापासून तैवानच्या स्थानिक राजकारणाचा अंतर्गत पाडाव यांचा समावेश आहे.[14] अमेरिका-चीन संघर्षाचे वैश्विक परिणाम होतील, असे मत सर्वच तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. पण भारताचा विचार करता, प्रत्यक्ष युद्ध जरी झाले नाही, तरी तत्सम केलेल्या एखाद्या लहानशा कृतीचेदेखील (म्हणजे करड्या प्रकारचे युद्ध- gray zone warfare) गंभीर परिणाम होतील, आणि त्यामुळेच आधीपासून नियोजन आणि तयारी करणे गरजेचे आहे. या करड्या कृतींमध्ये PRC कडून तैवानी अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडणारे मोठ्या प्रमाणावरचे संगणकीय हल्ले आणि तैवानला एकटे पाडून त्याची आयात आणि निर्यात बंद पाडणे असे आक्रमक पर्यायदेखील वापरले जाऊ शकतात. तैवानला होणारा अन्न आणि पाण्याचा पुरवठा तोडणे हे चीनचे उद्दिष्ट नसले, तरी त्या बेटावर असलेली हवाई आणि सामरिक हद्द नियंत्रित करून आणि त्याचे जहाजे किंवा विमानांपर्यंत पोचण्याचे मार्ग बंद करून चीन त्याच्यावरचा सार्वभौम हक्क दाखवून देऊ शकतो.[15] यातून प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात झाली नाही, तरी चीनने बळजबरीने तैवान ताब्यात घेऊ नये, यासाठी पश्चिमेकडून (निर्बंधांसहित) प्रत्युत्तर दिले जाईल. या प्रत्युत्तराचा थेट आणि अप्रत्यक्ष गंभीर परिणाम भारताच्या पुरवठा साखळीवर आणि जहाज वाहतूकीवर होईल, आणि तो भारताला टाळताही येणार नाही. युद्ध झाले किंवा झाले नाही, तरी या धोक्यामुळे भारताला तैवानच्या सामुद्रधुनीतल्या परिस्थितीवर बारिक लक्ष ठेवावे लागणार आहे. भारताला आपले राजनैतिक संबंध वापरून या तणावाच्या परिस्थितीचे रूपांतर संघर्षात होऊ न देण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे, आणि त्याचबरोबर, जर संघर्ष झालाच, तर त्या आकस्मिक परिस्थितीला तोंड देण्यासाठीचे नियोजनही करावे लागेल.

तैवानच्या सामुद्रधुनीतल्या परिस्थितीला वळण देतील असे भारताच्या बाजूचे कोणते भू-राजकीय आणि भू-आर्थिक अनिवार्य मुद्दे आहेत?

भू-राजकीयदृष्टीने पाहिले, तर हिंद-प्रशांत प्रदेशात भारताची अर्थव्यवस्था आणि व्यापार वाढल्यामुळे आणि अजूनही विस्तारत असल्यामुळे, भारताचे महत्त्व वाढलेले आहे. त्याच्या "पूर्वेकडे चला" (Act East) धोरणामुळे मलाका सामुद्रधुनीपासून थेट जपानपर्यंत प्रादेशिक भू-राजकारणात त्याला नव्याने स्वारस्य निर्माण झालेले आहे. भारताने ASEAN, जपान, दक्षिण कोरिया आणि सामुद्री देशांबरोबर उत्तम राजकीय संबंध प्रस्थापित केले आहेत आणि या प्रदेशात दीर्घकालीन शांतता आणि स्थैर्य रहावे अशी अनेक देशांप्रमाणे भारताचीही इच्छा आहे. शांतता राखली जावी या उद्देशाने भारताने ईस्ट एशिया समिट (EAS), ASEAN रीजनल फोरम (ARF), ASEAN डिफेन्स मिनिस्टर्स मीटिंग प्लस (ADMM-Plus) आणि क्वाड अशा विविधांगी समूहांमध्ये सहभाग घेतलेला आहे. जून 2018 मध्ये सिंगापूरच्या शांग्रिला इथे भारताच्या पंतप्रधानांनी हिंद-प्रशांत ध्येयाची रूपरेषा मांडली ज्यातून हे स्पष्ट झाले, की भारताची धोरणात्मक दृष्टी आता मुख्य समुद्रांकडे वळलेली आहे.[16] या प्रदेशात प्रादेशिक विस्तार करण्यासाठी पुढाकार घेणारा, सामरिक मार्गांवर आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जहाज वाहतुकीला सुरक्षा पुरवणारा आणि हिंद महासागराच्या उत्तरी भागात संकट उद्भवले, तर त्याला सर्वप्रथम प्रतिसाद देणारा देश म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. हिंद-प्रशांत प्रदेश स्वतंत्र, मोकळा आणि नियमबद्ध असण्यावरच भारताचे भविष्य अवलंबून आहे. त्याचबरोबर दीर्घ काळासाठी या प्रदेशात स्थैर्य, शांतता आणि सुरक्षितता राहण्यातच त्याचे भले आहे.

या प्रदेशात चीनचा विस्तार होणे हे फायद्याचेच आहे आणि भारताच्या आर्थिक विकासालाही त्याची मदतच होणार आहे. पण लगतच्या आणि आजूबाजूच्या प्रदेशातले चीनचे वर्तन आणि कृती अशा आहेत की त्यांमुळे हिंद-प्रशांत प्रदेशातल्या सर्वच उप-क्षेत्रांमध्ये कमी-अधिक प्रमाणात चिंतेचे वातावरण पसरलेले आहे. स्वत:च्या आग्रही परदेश आणि राष्ट्रीय सुरक्षा धोरणाला राबवून चीनला प्रबळपणे सत्ता मिळवायची आहे आणि तसे करत असताना त्याला अमेरिकेचा प्रभाव कमी, किंवा संपूर्णपणे संपवूनच टाकायचा आहे. त्यामुळे भू-राजकीय तणाव वाढला आहे आणि त्या आधी तिथे असलेल्या सकारात्मक वातावरणावर त्यामुळे परिणाम होऊन त्या प्रदेशाबद्दल आता कोणतेच ठोस अंदाज बांधता येत नाहीयेत, कारण स्थिती तणाव आणि संघर्षाच्या दिशेने जात आहे.

हिंद-प्रशांत प्रदेशाच्या विविध भागांत असलेला प्रादेशिक तणाव आणि वाढती चिंता यांच्याबरोबरीने भारत आणि PRC यांच्यामध्ये हक्कासंबंधीचे मुद्देदेखील आहेत. चीन आणि भारतादरम्यान 3,500 किलोमीटरची सीमा आहे ज्यावर चीनचा आक्षेप आहे आणि 1962 मध्ये याच सीमा मुद्द्यावरून दोन्ही देशांमध्ये संघर्षही झाला होता. असंख्य वाटाघाटी होऊनदेखील आजपर्यंत दोन्ही बाजूंना समाधानकारक असा तोडगा त्यावर काढता आलेला नाही. प्रत्यक्ष सीमा (the Line of Actual Control- LAC), म्हणजे जिथे दोन्ही देशांचे प्रत्यक्ष सैन्य या जमिनीवर तैनात आहे- त्याबद्दलही वाद आहेत. कोणतीही बाजू बळाचा वापर करून ही सीमा बदलण्याचा प्रयत्न करणार नाही, असा करार दोन्ही देशांनी केलेला असूनही, अलीकडच्या काळात चीनने लष्करी बळाचा वापर करून ही सीमा बदलण्याचा प्रयत्नही केला आहे. नैऋत्य सीमेवर चीनने वेगाने लष्करी ताकद वाढवली आहे, सुरक्षा-संबंधित नवीन हालचाली केल्या आहेत आणि पायाभूत सुविधांची बांधणीही केलेली आहे. LAC बद्दल कोणतेही स्पष्टीकरण देण्याची त्याची टाळाटाळ आणि सीमेवर शांतता आणि सलोखा राखण्यासाठी मान्य केलेल्या उपायांची अंमलबजावणी पूर्णपणे न करणे यांमुळे तिथे आता भयंकर लष्करी आव्हान उभे राहिले आहे. चीनच्या नवीन सुरक्षा दृष्टीकोनात चीनच्या लगतच्या प्रदेशांमध्येही त्याच्या सुरक्षेचा विस्तार (त्याच्या प्रदेशांच्याही पलीकडे) वाढवणे समाविष्ट केलेले आहे, ज्याचा अर्थ असा, की अनेक शतकांनंतर प्रथमच हिंद महासागरात चीन स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील झाला आहे. भारत एकाच वेळी उत्तरी सीमा आणि दक्षिणेत चीनची वाढती स्पर्धा यांचा सामना करत आहे. या धोरणात्मक “पिळवणुकी”मुळे भारताच्या भू-राजकीय खर्चात कमालीची वाढ होण्याची शक्यता आहे. चीनच्या एकीकरणाच्या योजना भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेशी जवळून संबंधित आहेत.

हे विसरता कामा नये, की 1950 च्या दशकाच्या उत्तरार्धात पूर्व आशियातल्या बदलत्या परिस्थितीकडे भारत लक्ष देऊ शकला नाही, कारण तैवान सामुद्रधुनीतल्या घडामोडींकडे तो बारकाईने नजर ठेवत नव्हता.[17] 1959 मध्ये PRC कडून तैवानच्या सामुद्रधुनीत जितका धोका होता, त्यापेक्षा अधिक धोका रशियाकडून क्यूबाला होता. त्यामुळे चीनवर आक्रमण करण्याच्या चिआंग-काइ-शेक यांच्या योजनांना युनायटेड स्टेट्सने फारसे गांभीर्याने घेतले नाही आणि चीनशी असलेले शत्रुत्व थोडे कमी केले. अमेरिकेच्या या बदललेल्या प्राधान्यामुळे क्यूबा मुद्द्यावरून 1962 च्या मध्यात अमेरिका-रशिया संबंध कमालीचे ताणले गेलेले असताना, अमेरिकेने PRC ला कळवले, की “GRC (Govt. Republic of China) कडून मुख्य प्रदेशावर कोणताही हल्ला झाला, तर अमेरिका त्याला पाठिंबा देणार नाही.”[18] त्यामुळे एकाच वेळेला दोन ठिकाणी (तैवानच्या सामुद्रधुनीत युनायटेड स्टेट्सविरुद्ध आणि नैऋत्य दिशेला भारताविरुद्ध) उद्भवू शकणाऱ्या संघर्षाची चीनला जी भीती होती, तीच दूर झाली. हे जवळपास सगळेच मान्य करतात, की अमेरिकेने PRC ला दिलेल्या या आश्वासनामुळे तो धोका दूर झाला आणि त्या एका महत्त्वाच्या कारणामुळे चीनने त्यानंतर भारताशी पुढे सीमा युद्ध छेडले.[19]

1950 च्या दशकात झालेल्या या घडामोडींनंतर हा धडा शिकता येईल, की तैवानच्या सामुद्रधुनीतल्या घडामोडींवर बारिक लक्ष ठेवले नाही, तर चीन आणि युनायटेड स्टेट्स परत एकदा तात्पुरते एक होतील आणि भारताकडे थेट लष्करी हल्ल्याच्या तयारीने बघण्याऐवजी चीन लष्करी डावपेच खेळून धाडस दाखवण्याचा धोका पतरकेल. त्यामुळे भू-राजकीय दृष्टीकोनातून तैवानच्या सामुद्रधुनीत पुढच्या दोन दशकांसाठी तरी शांतता आणि जैसे-थे स्थिती राखणे हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

भू-राजकीय अनिवार्यतेपेक्षाही आता काही नवीन आणि महत्त्वाच्या भू-आर्थिक गरजा आहेत, ज्यांमुळे भारताने तैवान प्रश्नाकडे बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. 1950 च्या दशकात कोलकताच्या पूर्वेला असलेल्या देशांवर भारताचे व्यापारी अवलंबत्व अगदीच कमी प्रमाणावर होते. त्यामुळे तैवानच्या सामुद्रधुनीत जे युद्ध झाले, त्याचा फारसा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर तेव्हा पडला नाही. आज जसे जग जवळ आलेले आहे, तसे ते विसाव्या शतकाच्या मध्यात आलेले नव्हते. 2023 मधली परिस्थिती खूपच बदललेली आहे. CSIS च्या अभ्यासानुसार, 2008 साली भारताने दक्षिण चीन समुद्रातून $123 बिलियनचा एकूण व्यापार केला, जो 2016 साली $208 बिलियनपर्यंत पोचला (म्हणजे, केवळ आठ वर्षांत 80 टक्क्यांनी वाढला) आणि हा व्यापार एकूण व्यवसायाच्या 30 टक्के होता.[20] 2016 नंतर आयात आणि निर्यातीमध्ये आणखी वाढ झाली असेल असे गृहित धरून, दक्षिण चीन समुद्रातून भारताच्या व्यापाराच्या आकारात आणि टक्केवारीत भरपूर वाढ झाली असेल अशी शक्यता आहे. चीन-तैवान संघर्ष झाला, तर दक्षिण चीन समुद्रातून व्यापार करणे अवघड जाईल कारण उत्तरेकडच्या सर्व सामरिक मार्गांवर अडथळे आणले जातील. हे महत्त्वाचे जलमार्ग बंद केले गेले, तर भारतीय अर्थव्यवस्थेतल्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर मोठा दुष्परिणाम होईल.

थेट वित्तीय नुकसानीबरोबरच, दुसऱ्या पातळीवर होणारे परिणाम अधिक नुकसानकारक असतील. ऱ्होडियम समूहाने 2022 साली केलेल्या अभ्यासानुसार, तैवान जगातल्या 92 टक्के अतिप्रगत लॉजिक चिपांचे (10 मिलिमीटरपेक्षाही कमी आकाराचा नोड असलेल्या) उत्पादन करतो आणि त्यापेक्षा कमी प्रतीच्या, पण तरीही महत्त्वाच्या चिपांचे 33 ते 50 टक्के उत्पादन करतो.[21] तैवान सेमीकंडक्टर मॅन्युफक्चरिंग कॉर्पोरेशन (TSMC) जगातल्या ऑटोमोटिव्ह मायक्रोकंट्रोलर्सपैकी 35 टक्के, स्मार्टफोन चिपसेट्सपैकी 70 टक्के आणि टेलिकॉम आणि वैद्यकीय क्षेत्राला लागणाऱ्या महत्त्वाच्या सुट्या भागांचे उत्पादन होते. चीनचे तैवानची कोंडी केली, तर भारत निर्यात करणाऱ्या सेमीकंडक्टरचा पुरवठा विस्कळित होईल आणि सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांवर त्याचा गंभीर परिणाम होईल.

चीनने तैवानची कोंडी केली आणि म्हणून पाश्चिमात्य देशांनी चीनवर आर्थिक निर्बंध लादले, तर भारतावर त्याचा आणखीनच वाईट परिणाम होईल. सर्वप्रथम, भारत आणि इशान्य आशिया (जपान आणि दक्षिण कोरिया) दरम्यानचे सगळे आर्थिक संबंध जवळपास संपुष्टातच येतील कारण तैवानच्या सामुद्रधुनीतून व्यापारी जहाजांना वाटच दिली जाणार नाही. एका अंदाजानुसार, एकूण जागतिक कंटेनर वाहतुकीच्या 50 टक्के कंटेनर तैवानच्या सामुद्रधुनीतून प्रवास करतात.[22] दुसरा म्हणजे, चीनबरोबर असलेला जागतिक व्यापार संकटात येईल, कारण पश्चिमेकडून येणाऱ्या निर्बंधांमुळे बँका चीनबरोबरच्या व्यापारासाठी कर्ज द्यायला अनुकूल नसतील आणि त्यामुळे संपूर्ण जगाचा अर्थपुरवठा विस्कळित होईल. एकूण जागतिक व्यापाराच्या 12 टक्के व्यापार चीनकडून होतो आणि चीन जेवढी निर्यात करतो, त्यापैकी निम्मी निर्यात जागतिक पुरवठा साखळीच्या महत्त्वाच्या घटकांसाठी असते.[23] तिसरे म्हणजे, ही साखळी विस्कळित झाल्यामुळे भारताच्या आर्थिक भागीदारांवर (पूर्वेकडच्या आणि पश्चिमेकडच्याही) परिणाम होईल. चौथे म्हणजे, चिपांच्या तुटवड्यामुळे संपूर्ण जगातली इलेक्ट्रॉनिक, वाहन आणि संगणक क्षेत्र बाधित होतील.[24] पाचवे म्हणजे, समुद्राखालून जाणाऱ्या केबलचे जाळे तैवानमधूनच जाते (आभासी जगताला बांधून ठेवणाऱ्या पंधरा मुख्य केबल वाहिन्या तैवान नोड वापरतात).[25] या केबलची सुरक्षा धोक्यात आली, तर जागतिक डिजिटल वहनामध्ये मोठ्या प्रमाणावर गोंधळ होईल.[26] त्यामुळे जागतिक व्यापाराला जो धक्का बसेल, त्यामुळे भारताच्या केवळ उत्पादन क्षेत्रालाच नव्हे, तर ई-कॉमर्स, संगणकीय सेवा, लॉजिस्टिक्स, मनोरंजन आणि इतर सेवा क्षेत्रांनाही मोठा फटका बसेल. भारतीय अर्थव्यवस्थेची ही प्रमुख क्षेत्र असल्यामुळे, लाखो भारतीय नागरिकांचे रोजगार धोक्यात येण्याची शक्यता आहे. ऱ्होडियम समूहाचा असा अंदाज आहे, की एक वर्ष जर तैवानची कोंडी झाली, तर त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचे सुमारे $2 ट्रिलियन (जगाच्या एकूण उत्पन्नाच्या 3 टक्के) नुकसान एका वर्षातच होईल.[27] आणखी एका अंदाजानुसार, चीनचे 7.6 टक्के, जपानचे 3.7 टक्के आणि युरोपचे 2.1 टक्के एकूण उत्पन्न बुडेल.[28] त्यामुळे तैवानच्या सामुद्रधुनीत कोणत्याही प्रकारचा संघर्ष झाला, कोंडी झाली किंवा त्याचे विलगीकरणही जरी झाले, तर त्याचे प्रचंड सामाजिक आणि आर्थिक परिणाम भारताला भोगावे लागतील.

त्यामुळे भू-राजकीय आणि भू-आर्थिक दृष्टीकोनातून पाहिले, तर तैवानच्या सामुद्रधुनीत जे काही होते, त्याचा भारताशी संबंध येतो. त्यामुळे भारताने धोरणात्मक स्पष्टता राखणे आवश्यक आहे, जेणेकरून संघर्ष झाला तर स्वत:चे हित जपण्यासाठी भारताची वाटचाल स्पष्ट असेल. हे धोरण विकसित करण्यासाठी 1950 च्या दशकात तैवानची समस्या 1954-55 आणि 1958 अशी दोन वेळा उद्भवल्यानंतर आणि तो प्रदेश संघर्षाच्या उंबरठ्यावर असताना भारताने ती परिस्थिती कशी हाताळली, याचा अभ्यास करणे उचित ठरेल. सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही पद्धतीचे धडे त्यातून शिकता येतील जेणेकरून सद्यस्थितीत भारताचे धोरण स्पष्ट करण्यासाठी (आणि ते समर्थनीय ठरण्यासाठीही मदत) होईल.

# 1954-55 आणि 1958 च्या पेचप्रसंगांच्या काळात भारताचे तैवान धोरण

सुरुवात करण्यापूर्वी, 1949 च्या अखेरीस भारताने रिपब्लिक ऑफ चायना (तैवान)ची राजनैतिक मान्यता काढून नव्याने स्थापन झालेल्या पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाला हस्तांतरित करण्याचे धोरण का अवलंबले, त्याचे कारण थोडक्यात जाणून घेणे इष्ट ठरेल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने

नॅशनलिस्ट चायनाबरोबर संबंध प्रस्थापित केले आणि राजधानी नानकिंग (आताचे नाव नानजिंग) इथे राजदूताची नेमणूकही केली. नोव्हेंबर, 1948 मध्ये  भारतीय राजदूत के एम पणीककर दिल्लीला कळवत होते, की मनचुरिया इथे लष्करी पराभव झाल्यानंतर आणि शूचाओ इथल्या युद्धानंतर चीनचे अध्यक्ष या नात्याने चिआंग काइ-शेक यांचे स्थान आता "असमर्थनीय" झालेले आहे.[29] त्यामुळे भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी "चीनच्या मावळत्या सरकारबरोबर" फार संबंध ठेवू नये असे परराष्ट्र खात्याला कळवले.[30] 1949 च्या मध्यापर्यंत कम्युनिस्टांनी जवळपास संपूर्ण मुख्य प्रदेश आणि नानकिंग ताब्यात घेतला होता. नेहरूंनी असे तात्पर्य काढले, की "आता (चिआंग काइ-शेक आणि कुओमिनतांग राजवट) परत सत्तेत येण्याची काही शक्यताच नाही."[31]

नवीन कम्युनिस्ट सरकारला मान्यता देण्याच्या प्रश्नावर भारताने सखोल चर्चा केली. मान्यता देण्यासाठी नकार, संपूर्ण मान्यता, आधीच्या राजवटीने केलेले तह आणि करार नवीन सरकारही मान्य करेल या अटीवर मान्यता आणि संपूर्ण कायदेशीर मान्यता असे चार पर्याय होते.[32] 17 नोव्हेंबर, 1949 रोजी झालेल्या उच्चपदस्थांच्या बैठकीत संपूर्ण मान्यता देण्याच्या पर्यायावर शिक्कामोर्तब झाले. भारत सरकारने असा निष्कर्ष काढला, की "(पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाची) ही नवी राजवट सुस्थापित आहे, स्थिर आहे आणि टिकून राहण्याची शक्यता आहे. हे वास्तव मान्य करणे ओघानेच येत आहे, जेणेकरून नवीन सरकारबरोबर सामान्य व्यवहार सुरू होऊ शकतील."[33]

PRC ला मान्यता देण्यापूर्वी भारत सरकारने कॉमनवेल्थ नेशन्स आणि ब्रिटिश सरकार यांच्यासह अनेक महत्त्वपूर्ण भागीदारांबरोबर चर्चा केली होती. "कम्युनिस्टांना संपूर्ण चीनवर सत्ता स्थापन करता न येण्याची काहीही आशा दिसत नाही" आणि मान्यता दिली नाही, तर "चीनमधले पाश्चिमात्यांचे हित जपणे फारच अवघड जाईल" (हे हित राजकीय होते आणि व्यापारीदेखील) या दोन कारणांसाठी ब्रिटिश सरकार लगेचच मान्यता देण्याच्या पक्षात होते.[34] युनायटेड किंग्डम याबाबतीत पुढे युनायटेड स्टेट्सशी चर्चा करणार होता आणि तेव्हा भारताने त्यांना पाठिंबा द्यावा यासाठी तो आग्रही होता. PRC ला मान्यता देण्यासाठी युनायटेड स्टेट्स फारसे अनुकूल नाही याची भारताला कल्पना होती. ऑक्टोबर, 1949 मध्ये अमेरिकेने भारताला एक स्मरणपत्र दिले, ज्यात भारताने घाई करू नये आणि "केंद्रीय कम्युनिस्ट राजवटीची घोषणा झाली म्हणजे चीन सरकारने विकसित केलेली आंतरराष्ट्रीय वचनबद्धता ही नवीन राजवट पूर्ण करण्यासाठी तयार असेलच, असे नाही", असा इशाराही दिला.[35] ऑक्टोबर महिन्यात नेहरू वॉशिंग्टनला गेले होते तेव्हा या मुद्द्यावर आणखी चर्चा झाली.[36] आज ना उद्या अमेरिका मान्यता देईलच, असे दिल्लीला अनेक स्रोतांकडून आश्वस्त केले जात होते. वॉशिंग्टन इथल्या भारतीय दूतावासाने कळवले, "नवीन चिनी राजवटीला मान्यता न देण्यासाठी स्टेट डिपार्टमेन्ट अनुकूल नाहीये, असे नाही."[37] नोव्हेंबर 1949 मध्ये भारताच्या हाय कमिशनरना ब्रिटनचे परराष्ट्र सचिव, अर्नेस्ट बेव्हिन म्हणाले, की युकेच्या भूमिकेशी  अमेरिकेचे मत आता हळूहळू संलग्न होत आहे, असे त्यांचे वैयक्तिक मत आहे. हा निरोप नेहरूंनी पाहिला आणि त्यावर आपली अद्याक्षरेही उमटवली.[38] नेहरूंनी असा निष्कर्ष काढला की, 'काही विशेष कारणांमुळे युनायटेड स्टेट्सने आत्ता, या पायरीवर मान्यता दिली नाही, तरी आम्हाला खातरी आहे, की तो देईल.'[39]

PRC चा आग्रहच होता, की "भारत जर प्रामाणिक असेल, तर त्याने सर्वप्रथम जिआंग जिएशी [चिआंग काइ-शेक] यांच्याशी संपूर्ण संबंध तोडून टाकावेत, त्या राजवटीला कोणताही पाठिंबा किंवा मदत देणे नाकारावे आणि याची अधिकृत घोषणा करावी."[40] त्याप्रमाणे, भारताने रिपब्लिक ऑफ चायनाची (किंवा कुओमिनतांग राजवट) मान्यता काढून घेतली आणि 30 डिसेंबर, 1949 रोजी नवीन राजवटीला मान्यता दिली.[41] त्या वेळेला जे वास्तव होते, ते लक्षात घेऊनच भारताने हा निर्णय घेतला होता. त्याचबरोबर, दुसऱ्या महायुद्धानंतर आशियातला व्यापक भू-राजकीय विचारही भारताने लक्षात घेतला होता. हा धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर भारताने चिआंग काइ-शेक यांच्या सरकारशी सगळे संबंध तोडले आणि नवीन कम्युनिस्ट राजवटीबरोबर संबंध प्रस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित केले.

या वरील कथनानंतर तीन महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतात. PRC ला मान्यता देताना भारताने प्रत्यक्ष परिस्थितीचे संपूर्ण अवलोकन आणि मूल्यमापन केले होते आणि हा बदल केल्यामुळे किती किंमत मोजावी लागेल आणि फायदे किती मिळतील याचे तुलनात्मक विश्लेषणही केलेले होते. (यात युनायटेड नेशन्स सेक्युरिटी काउन्सिलमध्ये जम्मू आणि काश्मिरच्या मुद्द्यावर काय परिणाम होईल, याचाही विचार करण्यात आला होता, कारण चीन त्याचा स्थायी सदस्य होता आणि अर्थातच त्यात तैवानचाही समावेश होता.)[42] दुसरे म्हणजे, PRC सत्तेत टिकून राहील असा निष्कर्ष भारताने

काढलेला होता. त्यामुळे, शेजारी देशाच्या नवीन सरकारला मान्यता देण्यात पुढाकार घेतला, तर दीर्घकालीन विचार करता, भारतासाठी ते फायदेशीर होईल असे भारताला वाटले.[43] तिसरे म्हणजे, रिपब्लिक ऑफ चायना (तैवान)ची मान्यता PRC कडे हस्तांतरित करताना भारत या मुद्द्याकडे आशियाच्या व्यापक भू-राजकीय स्थितीच्या दृष्टीनेही बघत होता. शीत युद्धामुळे दोन गट अस्तित्वात आल्यामुळे भारताला बांधल्यासारखे वाटत होते. आशियायी देशांनी एकत्र राहून आशिया खंडात एक नवीन भू-राजकीय समतोल राखावा ज्यातून भारताच्याही राष्ट्रीय हिताला प्राधान्य मिळाले असते, असे भारताला वाटत होते. या प्रयत्नासाठी चीनचा सहभाग आवश्यक होता. तैवानबरोबर संबंध चालू ठेवून किंवा PRC ला मान्यता देणे लांबणीवर टाकून फारसे काहीच हाती लागणार नाही, असा निष्कर्ष भारताने काढला.

असा एक सार्वत्रिक, लोकप्रिय गैरसमज आहे, की PRC ला मान्यता दिल्यानंतर भारताने पुढे तैवान मुद्द्याकडे लक्ष दिले नाही. संग्रहित स्रोत काही वेगळीच माहिती देतात. जगाच्या दृष्टीने, नेहरूंसमोर दोन पर्याय होते- सह-अस्तित्व किंवा सह-विनाश. सह-अस्तित्व राखायचे, तर नेहरूंचे असे मत होते, की भारताने त्रयस्थ रहावे आणि शांततेचे युग सुरू करावे. शीत युद्धाच्या काळात भारत कोणात्याच गटात सामील होणार नाही. असा त्याचा वास्तविक अर्थ होता. त्यामुळे, "त्या काळी ज्या दोन प्रवृत्ती होत्या, त्यापैकी एकीमध्येही संपूर्णपणे सम्मिलित न होणारे" असे भारताचे परराष्ट्र धोरण तयार झाले.[44] या परराष्ट्र धोरणाच्या चौकटीतूनच भारताने कोरिया आणि व्हिएतनाम इथले संघर्ष पाहिले आणि "जग, कधी हळू चालीने, तर कधी वेगाने एका मोठ्या संघर्षाच्या दिशेने चाललेले आहे",[45] अशी चिंता केली. नेहरूंचे असे मत होते, की "प्रचंड क्षमता असणारा भारत एक स्वतंत्र देश आहे आणि स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या भारताला झटकून टाकता येणार नाहीत."[46] त्यामुळे, आशियायी भू-राजकीय स्थिती स्थिर ठेवायची जबाबदारी भारतावर होती. प्रादेशिक संघर्ष चिघळून युद्ध छेडले जाईल इतकी परिस्थिती बिघडणार नाही यासाठी भारताने प्रयत्न केले पाहिजेत, कारण तसे झाले, तर ते भारताच्याच विरोधात जाईल, असे नेहरूंचे मत होते.[47] नेहरू असेही म्हणाले होते, की आशियायी समस्यांमध्ये पाश्चिमात्य देशांना खूप स्वारस्य वाटत असले, तरीही "आपल्या आणि आशियाच्या नशीबाला आकार देताना आपले मत विचारात घेतलेच पाहिजे."[48] आशियामध्ये नव्याने समतोल राखण्यासाठी; "जो पाश्चिमात्य सत्तांनी आशियायी देशांना विश्वासात न घेता ठरवला नसेल" असा समतोल राखण्यासाठी PRC चे स्थान महत्त्वाचे आहे आणि त्याची भारताला मदत होईल असे भारताला वाटत होते.[49]

अती पूर्व आशियात युनायटेड स्टेट्स आणि PRC मध्ये संघर्ष झाल्यानंतर भारताच्या या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात, कोरियन युद्धाच्या वेळी निर्माण झाली होती, तशी गुंतागुंत निर्माण झाली. त्या युद्धाच्या वेळी जे अनुभव आले, त्याने भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या मध्यस्थीच्या परिस्थितींसाठी वस्तूपाठ घालून दिला. रुद्र चौधरी लिहितात, की त्या वेळी नेहरूंनी असे घोषित केले की,

> " 'मध्यस्थी करण्यासाठी भारत आपले सर्वोत्तम प्रतिनिधी पाठवू शकेल', पण, 'तशी विनंती केली गेली, तरच.' कम्युनिस्ट चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यान भारत निरोपांची देवाणघेवाण करू शकेल असा संदेश देण्यात आला होता. पण हे प्रयत्न करताना आणि मध्यस्थ म्हणून काम करताना, भारत अमेरिकेच्या भूमिकेला समर्थन देणार नाही एवढे अंतर राखणे अनिवार्य होते. शिवाय, अमेरिका सहजपणे अती पूर्वेत युद्ध छेडेल अशी परिस्थिती असताना भारत त्यात ओढला जाणार नाही याची काळजी घेणे गरजेचे होते. घडणाऱ्या घटना 'शक्य तितक्या वस्तूनिष्ठपणे बघणे' गरजेचे होते आणि 'उत्साहाच्या भरात वाहवत न जाणे' इष्ट होते. हे अवघड झाले असते. अखेर नेहरूंच्याच लक्षात आले, की 'तलवारीच्या टोकावर समतोल राखण्याइतके अतिशय अवघड असे हे कार्य होते.' "[50]

त्याप्रमाणे, कोरिया युद्धात बळाचा वापर करण्यासाठी भारताने विरोध केला आणि सगळ्या देशांबरोबर मैत्रीपूर्ण राखण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून त्याच्याकरवी संवाद साधला जाईल आणि त्याचवेळी धोरणात्मक स्वायत्तताही राखता येईल.[51] भारताला याचेही भान होते, की "अमेरिकेशी जवळीक दाखवणे, म्हणजे अंतत: PRC ला, त्याच्या शेजारी देशाला विरोध करणे."[52] कोरियन युद्धातून एक महत्त्वा धडा शिकायला मिळाला, की भारताच्या प्रादेशिक हिताबद्दल हातमिळवणी होऊ शकली नाही, ज्यामुळे PRC बरोबर जमवून घेण्याला पर्याय राहिला नाही आणि युनायटेड नेशन्समध्ये त्याचा शिरकाव होण्यासाठी प्राधान्य द्यावे लागले.[53] तैवानच्या सामुद्रधुनीतल्या पहिल्या संघर्षातून मिळालेले हे धडे परत एकदा समजून घेण्याची आवश्यकता आहे.

तैवान प्रश्न "धोकादायक" आहे, असे नेहरू म्हणत, कारण एकही पक्ष समेटासाठी प्रयत्नही करत नव्हता.[54] नेहरूंचे असे मत होते, की या पेचामुळे "अती पूर्वेकडची परिस्थिती हळूहळू बिघडतच देलेते जाईल."[55] या कारणामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात तैवानचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा होऊन बसला.

सार्वभौमत्वाच्या मुद्द्यावर भारताचे धोरण स्पष्ट होते. "कायदेशीर मार्गाने आणि ऐतिहासिकदृष्ट्याही चीनचा तैवानवरचा हक्क हा चीन सरकारच्या बाजूने होता."[56] नेहरूंचे असेही मत होते, की फोर्मोसा (तेव्हाचे तैवानचे नाव) चीनच्या ताब्यात जाऊ नये, यासाठी अमेरिका मुद्दामच अडथळे निर्माण करत आहे. चिआंग काइ-शेक यांना "फोर्मोसा ताब्यात ठेवणे आणि त्याबरोबर चीनच्या मुख्य भूमीच्या लगतच्या बेटांनाही ताब्यात घेणे"[57] यासाठी अमेरिका मदत करत होती. थोडी सबूरी दाखवावी असे भारताने सुचवले. नेहरूंनी लिहिले, "फोर्मोसाबद्दल स्पष्ट धोरण घोषित करावे, ज्यामुळे परिस्थितीतला तणाव निवळेल, असे आम्ही अमेरिकेला सुचवले आहे. कोणतीही अविवेकी किंवा चिथावणीखोर कृती धोकादायक ठरू शकेल, आणि म्हणूनच ती टाळावी, असे आम्ही चीन सरकारला सुचवले आहे. पण आमचा प्रभाव मर्यादित आहे आणि शांतीदूताची भूमिका नेहेमीच अवघड असते."[58]

## तैवानच्या सामुद्रधुनीतला पहिला संघर्ष

तैवानच्या सामुद्रधुनीतला पहिला संघर्ष (1954-55) हा अधिककरून चीनच्या मुख्य प्रदेशाच्या दहा सागरी मैलांच्या परिसरात, पण तैवानच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या बेटांभोवती (विशेषत: जिनमेन/ क्युमॉय आणि माझू/मात्सू बेटे, यापुढे ज्यांचा उल्लेख ऑफशोअर बेटे असा केला जाईल) केंद्रित होता. या ऑफशोअर बेटांवर चिआंगने लष्करी तैनात वाढवली आणि पुढे PRC ने त्यांवर हल्ला केला. त्यामुळे ऑगस्ट, 1954 पासून चीन आणि युनायटेड स्टेट्समध्ये तणाव निर्माण झाला. याच्याशी भारताचा काही थेट संबंध नव्हता आणि त्यावर थेट परिणामही झालेला नव्हता, तरीही "भीतीचे एक न भेदता येणारे चक्र" निर्माण होत आहे अशी चिंता त्याला वाटत होती. अमेरिका चीनच्या विरोधात कम्युनिस्ट विरोधी लष्करी संघ बांधत होती (साऊथ इस्ट एशियन ट्रीटी ऑर्गनायझेशन- SEATO) आणि अशा आग्नेय आशियायी देशांचे संघटन[59] करण्याचा अमेरिकेचा कट उधळून टाकण्यासाठी चीन एक आशियायी समूहाची निर्मिती करत होता.[60] या संघर्षाच्या सुरूवातीलाच नेहरूंनी यावर उघड भाष्य केले. ऑगस्ट, 1954 मध्ये ते संसदेत बोलताना म्हणाले, "जेव्हा एखादी समस्या किंवा निर्णय यांमुळे एखादे युद्ध किंवा शांतता निर्माण होऊ शकते, जेव्हा ते युद्ध संपूर्ण जगात पसरू शकते, तेव्हा ती एक स्थानिक, प्रादेशिक किंवा खंडीय समस्या उरत नाही- ती एक जागतिक समस्या होते."[61] "संपूर्ण जग एका कड्याच्या टोकावर बसलेले असताना", "शांततेच्या पारड्यात आपले वजन टाकावे", ही भारताची जबाबदारीच आहे असे त्यांचे मत होते.[62]

ऑक्टोबर, 1954 मध्ये नेहरू यांचा माओशी संवाद झाला. माओने त्यांना सांगितले, की युनायटेड स्टेट्स आणि चिआंग काइ-शेक ऑफशोअर बेटांचा वापर करून चीनला हानी पोचवण्याचा प्रयत्न करत आहेत[63] आणि तैवानकडून "चीनच्या मुख्य प्रदेशाला सतत धोका आहे".[64] यामुळे, नेहरूंनी असा निष्कर्ष काढला, की PRC चे सगळे लक्ष ऑफशोअर बेटांभोवती केंद्रित आहे.[65] माओने अशी आशा व्यक्त केली, की तैवानवरून युद्ध करण्यासाठी चीन उत्सुक नाहीये हे भारताने युनायटेड स्टेट्सला कळवावे.[66] त्यानंतर झोउ एन्लाय यांच्याबरोबर झालेल्या संवादात, त्यांना तैवान प्रश्नात मध्यस्थी करायची इच्छा नाही, असे जरी नेहरू म्हणाले असले, तरी यानंतरच पुढे भारताने तैवानच्या सामुद्रधुनीतल्या पहिल्या पेचप्रसंगात[67] पुढाकार घेतला.

भारताला अनेक ठिकाणहून, विशेषत: ब्रिटिश सरकारकडून प्रोत्साहन मिळाले. युनायटेड स्टेट्स आणि यु.के.दरम्यान "स्पष्ट आणि विचलित करेल इतके मतांतर आहे" (पाश्चिमात्य जगात हे दोन देश भारताचे मुख्य भागीदार होते) असे 1949 मध्येच भारताच्या लक्षात आले होते.[68] जेव्हा संघर्षाची सुरूवात झाली, तेव्हा चीन-अमेरिकन टक्करीमुळे त्यांच्या त्या प्रदेशातल्या मोठ्या प्रमाणावरच्या हितसंबंधांमध्ये गुंतागुंत निर्माण होईल अशी चिंता ब्रिटिशांना वाटायला लागली. विशेषत:, बीजिंगला अस्वस्थ करण्यासाठी युनायटेड स्टेट्स तैवानबरोबर म्युचुअल डिफेन्स ट्रीटीवर सह्या करणार आहे या बातमीने ब्रिटिशांची चिंता वाढली. बीजिंगबरोबर संवाद झाल्यानंतर नेहरूंचा असा निष्कर्ष होता, की तैवानचा ताबा मिळवण्यापेक्षा

ऑफशोअर बेटांचा ताबा मिळवण्यासाठी चीन अधिक प्राधान्य देत आहे, आणि हे ब्रिटिश सरकारच्या दृष्टीकोनाशी संलग्न होते. वॉशिंग्टनमधल्या ब्रिटिश राजदूताने नेहरूंचा निष्कर्ष जॉन फॉस्टर ड्यूल्स या अमेरिकन सेक्रेटरी ऑफ स्टेटलाही सांगितला आणि त्याला हेही सांगितले, की 'आमच्या सूत्रांकडून आम्हाला ही माहिती मिळालेली आहे, की किनारी बेटांच्या आसपासची परिस्थिती जितकी वाटते तितकी भयंकर नाहीये. राष्ट्रीय दबावाखाली येऊन अमेरिकेने ट्रीटीवर सही केली तर ते धोकादायक होऊ शकेल, कारण या तहाच्या अटींमध्ये अथवा त्याच्यासोबत जोडलेल्या तहाच्या आवश्यकतेच्या मुद्द्यांमध्ये असे कुठेही स्पष्ट केलेले नाही, की फोर्मोसाचा वापर एखाद्या 'विशेषाधिकार असलेल्या भूमीसारखा'[69] केला जाणार नाही." ऑफशोअर बेटांच्या समस्येचे समाधान करणारा उपाय सापडला, तर मोठा संघर्ष टाळता येईल, या मुद्द्यावर भारत आणि युके एकत्र आले.

1949 नंतर अमेरिकेची चीनकडे पाहण्याची दृष्टी बदलली. कोरिया आणि भारत-चीन संघर्ष आणि आशियामधला चीनचा एकूणच वावर यावरून भारत आणि अमेरिकेमधली दरीही हळूहळू रुंदावली.[70] चीनला संशयाचा फायदा देण्याच्या भारताच्या भूमिकेमुळे वॉशिंग्टनमध्ये असंतोष होता.[71] सप्टेंबर, 1954 मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखाली आग्नेय आशियामध्ये एकत्रित सुरक्षा व्यवस्था करण्यामध्ये सहभागी होण्यासाठी भारताने नकार दिल्यानंतर, कम्युनिस्ट चीनबरोबर असलेल्या भारताच्या "मैत्री"बद्दल वॉशिंग्टनची चिंता वाढली. नेहरूंनी केलेल्या चीनच्या दौऱ्यावर अमेरिकेचे बारिक लक्ष होते. त्यांनी त्यानंतर चीनबद्दल केलेले सकारात्मक भाष्य आणि विशेषकरून ऑफशोअर बेटांवर असलेल्या चीनच्या दाव्याबद्दल केलेले विधान यांमुळे तत्कालीन अध्यक्ष ड्वाईट आयजेनहॉवर आणि अमेरिकन प्रशासनाच्या नजरेत भारताची प्रतिमा डागाळली.[72] त्यामुळे, जेव्हा तैवानबद्दल नेहरूंशी बोलावे असे ब्रिटिशांनी जेव्हा अमेरिकेला सुचवले,[73] तेव्हा अमेरिकेने त्याला विरोध केला.[74] अगदी सुरुवातीपासूनच एक संभाव्य मध्यस्थ म्हणून अमेरिकेने भारताकडे कधी पाहिले नाही, भारताशी अमेरिकेने कधी सल्लामसलतही केली नाही.[75]

1955 च्या सुरुवातीला तैवानच्या सामुद्रधुनीतला पहिला पेचप्रसंग आणखी चिघळला. 2 डिसेंबर, 1954 ला अमेरिकेने तैवानबरोबर म्युचुअल डिफेन्स ट्रीटीवर सह्या केल्या. त्याद्वारे, 1955 सालचा फोर्मोसा ठराव मंजूर करण्यात आला, ज्यायोगे कम्युनिस्ट हल्ल्यापासून तैवानचे रक्षण करण्यासाठी आणि त्या कारणास्तव अमेरिकन अध्यक्षांना तिथे लष्कर तैनात करण्याची परवानगी देण्यात आली. "अती पूर्वेकडची थोडीफार स्फोटक स्थिती"[76] असे नेहरूंनी याचे वर्णन केले. ड्युल्स यांनी या संघर्षाचे "तैवानचे युद्ध"[77] असे वर्णन केल्यामुळे ॲंग्लो-अमेरिकन संबंधही ताणले गेले, कारण या अशा वर्णनामुळे "आशियायी समुदाय घाबरून चीनच्या आश्रयाला जाईल"[78] अशी चिंता ब्रिटिशांना वाटत होती. त्यामुळे आशियात असलेले युकेचे हितसंबंध गुंतागुंतीचे झाले असते आणि त्याचबरोबर, कॉमनवेल्थबरोबरच्या संबंधांवरही परिणाम झाला असता. युनायटेड किंग्डमने युनायटेड स्टेट्सला सांगितले, की किनारी बेटांच्या शत्रुत्वामध्ये तो सामील झाला, तर ॲंग्लो-अमेरिकन संबंधांवर त्याचा गंभीर परिणाम होईल. याला उत्तर म्हणून अमेरिकेने स्पष्ट केले, की PRC ला कोणतीही सवलत देणे धोक्याचे ठरू शकते आणि ड्यूल्स यांनी 1938 च्या म्युनिक कराराची आठवण करून दिली.[79]

PRC आणि युनायटेड स्टेट्समध्ये जी पेचाची स्थिती उद्भवली होती, ती निवळावी यासाठी ब्रिटिश सरकार भारताला आवाहन करत होते. तैवानच्या सामुद्रधुनीत परस्पर युद्धविराम करण्यासाठी बीजिंगला तयार करावे आणि बदल्यात अमेरिकेने चिआंग काइ-शेक यांचे मन ऑफशोअर बेटे रिकामी करण्यासाठी वळवावे असे प्रयत्न सुरू होते. ही कल्पना नेहरूंना पसंत होती, कारण ऑफशोअर बेटांमध्ये PRC ला अधिक स्वारस्य आहे आणि त्यांबाबत चिंताही आहे, असे त्यांचे विश्लेषण होते. डिसेंबर, 1954 मध्ये वॉशिंग्टन इथले ब्रिटिश राजदूत, सर रॉजर वॅकिन्स भारतीय राजदूत, जी एल मेहता यांना म्हणाले, की 'पेकिंग सरकारने चिनी किनाऱ्यावरची कुएमॉयसारखी छोटी बेटे ताब्यात घेतली, तर कदाचित अमेरिका त्याबद्दल काही आक्षेप घेणार नाही; अट इतकीच की त्याने फोर्मोसाला धमकावू नये.'[80] यानंतर एका महिन्याने लंडन इथे कॉमनवेल्थ देशांच्या पंतप्रधानांची बैठक झाली (31 जानेवारी ते 9 फेब्रुवारी, 1955), तेव्हाही ब्रिटिश समकक्षाकडून नेहेरूंना परत संकेत मिळाले, की अशा परस्पर करारासाठी अमेरिका अनुकूल असू शकते.[81] कॅनडाचे परराष्ट्र मंत्री, लेस्टर पीअरसन यांचे ड्युल्स यांच्याबरोबर बोलणे झाल्यानंतरही साधारण असाच निरोप कॅनडाकडून मिळाला.[82] नेहरूंचा कदाचित असा समज झाला, की दोन्ही बाजूंवर भारताने प्रभाव टाकावा यासाठी त्याला पाठिंबा आहे. तैवानच्या ऑफशोअर बेटांवरून निर्वासन "कोणत्याही संघर्षाविना झाले, तर अप्रिय घटना घडण्याची शक्यता कमी होईल" असे त्यांना वाटले.[83] म्हणून, ऑफशोअर

बेटांमधून तैवानची माघार होऊन त्या बदल्यात तैवानच्या सामुद्रधुनीत परस्पर युद्धविराम व्हावा यासाठी भारताने युनायटेड स्टेट्स आणि PRC बरोबर 1955 साली संवादाचे नव्याने प्रयत्न सुरू केले.

मार्च महिन्यात, भारताचे संसदपटू आणि भारताचे युएनमधले मुख्य प्रतिनिधी व्ही के कृष्ण मेनन यांनी अमेरिकेला सुचवले, की "कोणत्याही प्रकारची प्रगती करायची असेल, तर युनायटेड स्टेट्स आणि चीन यांच्या दरम्यान थेट पण अनौपचारिक संबंध प्रस्थापित होणे आवश्यक आहे." त्याकरता एखादा "त्रयस्थ पक्ष" मदत करू शकतो, असेही त्यांनी सुचवले.[84] अमेरिकेकडून काहीही प्रतिक्रिया आली नाही. नेहरू आणि कृष्ण मेनन यांनी फेब्रुवारी, 1955 मध्ये चीनच्या तैवानवरच्या हक्काचा पुनरुच्चार आणि तैवानला पाठिंबा दिल्याबद्दल अमेरिकन लष्कराचा निषेध संसदेत केला होता. अमेरिकेला याची कल्पना होती.[85] मेनन आणि भारतीय राजदूत, जी एल मेहता यांनी 15 मार्च, 1955 रोजी ऐजेनहॉवर यांची भेट जेव्हा घेतली तेव्हा त्यांचा असा समज झाला, की "अध्यक्ष आणि ड्यूल्स यांनी अती पूर्वेच्या परिस्थितीबद्दल विषय काढायचा नव्हता किंवा कसलाही वादही सुरू करायचा नव्हता."[86] पण भारताने मध्यस्थी करावी अशी अमेरिकेची इच्छा नाही, हे मेनन यांच्या लक्षात आले नाही. त्यामुळे, मेनन यांनी जेव्हा त्यांना PRC ला विस्तारवादाची महत्त्वाकांक्षा नाहीये हे ड्यूल्स यांच्या मार्चमध्ये झालेल्या भेटीत सांगितले, तेव्हा भारत पक्षपाती आहे, हा त्यांचा संशय खरा ठरला. चीनबरोबर भारताची मैत्री, शिवाय स्टालिनच्या मृत्यूनंतर सोव्हिएत युनियनबरोबर भारताचे वाढलेले संबंध आणि PRC च्या मुद्द्यावर अमेरिकेला न दिलेला पाठिंबा, यामुळे युनायटेड स्टेट्स आणि भारत यांच्यात अविश्वास वाढायला लागला. आणि, 1950 मध्ये त्या परिस्थितीत या संबंधांच्या बाजूने प्रयत्न करायला फारसे मध्यस्थही नव्हते. अमेरिकेला माहित होते, की एप्रिल महिन्यात बांडुंग इथल्या ॲफ्रो-एशियन परिषदेत मेनन उपस्थित राहणार आहेत (आणि तिथे झोउ एन्लायही उपस्थित राहणार होते), पण तरीही तिने संवादासाठी पुढाकार घेतला नाही.[87] 1955 च्या एप्रिलच्या सुरुवातीला. बांडुंग परिषदेच्या आधी अमेरिकेच्या ड्यूल्स यांनी ब्रिटिश परराष्ट्र मंत्र्याला कळवले, की चीनबरोबर वाटाघाटी करण्याचा निरोप देण्यासाठी अमेरिका भारत सोडून अन्य कोणत्याही देशाचा उपयोग करेल.[88] पुढे अमेरिकेने या कामासाठी टर्की, इजिप्त, इराण, पाकिस्तान, थायलंड आणि जपानचा वापर केला.[89]

1950 च्या काळात आणखी एक धडा शिकायला मिळाला. भारताने ऑफशोअर बेटे आणि युद्धविरामाबद्दल चीनशी संवाद साधावा यासाठी ब्रिटन त्याचा पाठपुरावा करत असतानाच, चीन ब्रिटनला त्याचवेळी अन्य मार्गाने सांगत होता, की हा प्रस्ताव "अतिशय वाईट" आहे.[90] पण ही माहिती आणि फेब्रुवारी, 1955 मध्ये झोउ एन्लाय यांच्याबरोबर ब्रिटिश परराष्ट्र सचिव, ॲन्थनी इडन यांचा संपर्क सुरू होता हे भारतापासून लपवण्यात आले. भारताला याबद्दल फार नंतर कळवले गेले. त्यामुळे, असा निष्कर्ष काढता येतो, की नेहरू (आणि इतरही अनेक जण त्यांना आग्रह करत होते, ते) अशा एका प्रस्तावाचा पाठपुरावा करत होते, जो आधीच फेटाळला गेला होता.

एप्रिल, 1955 मध्ये बांडुंग इथे चीनने "अती पूर्वेकडे आणि विशेषत: तैवानमध्ये जो तणाव निर्माण झाला आहे, त्याबद्दल अमेरिकेशी बसून बोलायची" तयारी दर्शवली.[91] नेहरूंना परत एकदा वाटले, की सर्व पक्षांशी खाजगी संवाद साधून अनौपचारिक भूमिका निभावण्याची भारतासाठी एक उत्तम संधी आहे.[92] त्यामुळे झोउ यांनी जेव्हा मे, 1955 मध्ये कृष्ण मेनन यांना चीनला बोलणी करण्यासाठी आमंत्रित करण्याचा प्रस्ताव मांडला, तेव्हा नेहरूंनी तो स्वीकारला आणि या भेटीला अमेरिकेकडून मान्यता मिळेल अशी अपेक्षा केली. पण वॉशिंग्टनच्या डिपार्टमेन्ट ऑफ स्टेटकडून मुळीच उत्साह दाखवला गेला नाही.[93] "जर आणि जेव्हा ते पेपिंगला भेट देतील, तेव्हा त्यांना [भारत आणि इतर देश] आमच्या वतीने बोलायचा आदेश आहे, असा त्यांचा समज करून देणे टाळावे."[94] असा संदेश देण्यात आला. मे महिन्यात असाच संदेश परत एकदा देण्यात आला. "मेनन भेटीनंतर जो अहवाल सादर होईल, त्यात आम्हाला पूर्ण स्वारस्य असेल, पण सध्याच्या काळात आम्ही कोणत्याही विशिष्ट मध्यस्थाचा स्वीकार करण्यासाठी तयार नाही."[95]

अमेरिका आढेवेढे घेत असूनही नेहरूंनी बाजू लावून धरली होती. त्यांनी ऐजेनहॉवर यांना सांगितले, की कृष्ण मेनन "यांनी तो संवाद साधला आहे, त्यामुळे असा विश्वास वाटतो, की तणाव कमी करण्यासाठी पावले उचलली जातील आणि वाटाघाटी करण्यासाठी मार्ग मोकळा होईल आणि हे सगळे व्हावे, अशी इच्छा आहे, असे दिसते."[96] त्यांच्या आग्रहामुळे मेनन यांना ऐजेनहॉवर आणि ड्यूल्स भेटले, पण मेनन जे काही वॉशिंग्टनमध्ये बोलले ते अमेरिकेच्या दृष्टीने बिनमहत्त्वाचे होते. मेनन यांनी म्हणे ड्यूल्स यांना असे सांगितले, की चीन ऑफशोअर बेटे बळाचा वापर करूनही

ताब्यात घेऊ शकतो.[97] असे सांगून त्या बेटांबाबत कोणताही निर्णय न घेताच अमेरिका माघार घेईल, अशी त्यांना आशा होती. जेव्हा मेनन यांनी ड्यूल्स यांना, "ब्रिटिशांसह सर्वांनीच हे मान्य केलेले आहे, की ही बेटे चीनचा भाग आहेत", असे सांगितले, तेव्हा ड्यूल्स यांनी हाँगकाँगचा विषय काढला, आणि ब्रिटिश त्या बेटांवरचा हक्क सोडून द्यायला तयार आहेत का, असे विचारले.[98] 1 आणि 6 जुलै, 1955 रोजी मेनन आणि ड्यूल्स यांच्या दोन भेटी झाल्या. पण नोंदींमधून असे दिसते, की दोन्ही वेळेला एकमत होऊ शकले नाही. मेनन यांनी अनेक वेळा हमी दिली, की भारत कोणत्याच पक्षाची (अमेरिका वा चीन) बाजू घेत नाहीये आणि "अती पूर्वेकडे शांतता रहावी आणि सत्तेच्या तराजूचा समतोल ढळू नये, याकडे लक्ष देणे इतकाच फक्त भारताचा हेतू आहे"[99]. पण भारताच्या निष्पक्षपातीपणा आणि प्रामाणिकपणाबद्दल एव्हाना अमेरिकेत संदेह निर्माण झाला होता. द्वीपक्षीय संवादाच्या झोउ यांच्या विनंतीला मान देण्यासाठी त्यांनी ब्रिटिशांचा वापर केला.[100] अखेर, वॉरसॉ इथे ब्रिटिशांच्या मध्यस्थीतून अमेरिका आणि PRC येथे राजदूतांमार्फत बोलणी सुरू झाली, ज्यामुळे हळूहळू तैवानच्या सामुद्रधुनीतला तणाव निवळला आणि संघर्षाचीही शक्यता कमी झाली. तैवान सामुद्रधुनीतला पहिला संघर्ष निवळताना भारताला त्यात कोणतीही भूमिका निभावता आली नाही. "तुम्ही परत जा, तुमचा काहीही उपयोग नाहीये[101] – अशा शब्दांत तुमचे सचिव (ड्यूल्स) मला म्हणाले." (अमेरिकेचे 'निअर ईस्टर्न अफेअर्स'चे सहसचिव, जॉर्ज ऍलन यांच्याशी बोलताना) कृष्ण मेनन यांचे हे कटू शब्द होते. अमेरिकेने मित्रदेशाचाच (ब्रिटन) वापर अखेर केला. त्यांच्या दृष्टीने त्यांचा भागीदार देश (भारत) पक्षपाती आणि एका बाजूला कललेला होता. ब्रिटिशांनी स्वत:चा फायदा करून घेण्यापुरता भारताचा वापर करून घेतला आणि स्वत:चा संवादाचा पूल (झोउ आणि इडन) अशा पद्धतीने बांधला, की चीनशी बोलणी करण्याकरता भारताची गरजच राहिली नाही. बीजिंगलाही वाटले होते, की भारतामार्फत अमेरिकेशी बोलणी करता येतील (मे, 1955 मध्ये मेनन यांनी बीजिंगला भेट दिल्यानंतर झोउ स्वत: ट्रेव्हेलयान यांना असे म्हणाले होते)[102], पण त्यांनाही कळून चुकले, की अमेरिकेशी बोलणी करायची असतील, तर ब्रिटिश अधिक प्रभावी आहेत.

तणाव कमी करण्याचे भारताचे प्रयत्न फारसे यशस्वी होऊ शकले नाहीत, तरी स्वत:चे भू-राजकीय हित जपण्यासाठी भारत राजनैतिक प्रयत्न करण्यात आघाडीवर होता, हे मात्र यातून स्पष्ट झाले. ऑगस्ट, 1955 मध्ये तैवानच्या सामुद्रधुनीतला पहिला पेचप्रसंग निवळला हे भारताच्या दृष्टीने चांगले झाले. भारत मध्यस्थी करत होता, हे नेहरूंनी अधिकृतपणे कधी मान्य केले नाही[103], पण त्यांनी, "पेकिंग, लंडन, ओटावा आणि वॉशिंग्टन यांच्याशी अनौपचारिक संवादांत त्या दिशेने भारताचे प्रयत्न सुरू झाले आहेत", असे मान्य केले.[104]

## तैवानच्या सामुद्रधुनीतला दुसरा संघर्ष

ऑगस्ट, 1958 मध्ये आणखी एक संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. चीनने ऑफशोअर बेटांवर तोफगोळ्यांचा भडिमार सुरू केला आणि अमेरिकेने जाहीर केले, की हल्ला झालास, ती तो परतवून लावेल. मोठा सत्तासंघर्ष होणार अशी चिन्हे होती. तैवानच्या सुरक्षिततेसाठी अमेरिकेने आपले नाविक दल तैनात केले आणि प्रत्युत्तर म्हणून चीनने 1958 च्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घोषित केले, की ऑफशोअर बेटे त्याच्या प्रादेशिक हद्दीत (12 नॉटिकल मैल) येतात. हा संघर्ष इतका टोकाला गेला, की 8 सप्टेंबरला सोव्हिएत युनियनचे तत्कालीन सचिव निकिता ख्रुस्चेव यांनी ऐजेनहॉवर यांना लिहिले, की अमेरिकेने चीनवर हल्ला केला, तर तो सोव्हिएत युनियनवर हल्ला केला आहे, असे समजले जाईल.

या घडामोडींचा प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यावर मोठा परिणाम होईल, असे भारताला वाटले आणि नेहरूंना परत एकदा "ठामपणे असे वाटले, की सर्वांनी मिळून शक्य तितका प्रभाव टाकून ही आपत्ती घडण्यापासून रोखावी"[105]. ज्या ऑफशोअर बेटांवर तैवानचा ताबा होता, त्यावर काहीतरी कायमस्वरूपी तोडगा काढायला हवा यासाठी भारताकडून परत प्रयत्न सुरू झाले, कारण त्यामुळे चीनच्या मुख्य प्रदेशाला सतत धोका वाटत होता.[106] 30 सप्टेंबर, 1958 रोजी ही कल्पना (ऑफशोअर बेटांचा ताबा तैवानने सोडणे आणि बदल्यात PRC ने युद्धविराम घोषित करणे) झोउ यांच्या कानावर भारताचे बीजिंगमधले राजदूत जी पार्थसारथी यांनी जेव्हा घातली, तेव्हा त्यांनी ती तातडीने झटकून टाकली. "श्री. कृष्ण मेनन यांना कृपया कळवा, की त्यांच्या दयाळूपणाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत, पण आम्हाला काहीही घाई नाहीये", असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. "जर अमेरिकेने युद्धविरामाचा प्रस्ताव नाकारला, तर आम्हाला लढण्यावाचून पर्याय नाही, तिथे समेटाला वावच नाही"[107], असेही ते पुढे म्हणाले. बीजिंग इथे असलेल्या एस एफ एँटोनोव्ह या सोव्हिएत राजदूताला झोउ म्हणाले, की अमेरिकेच्या सांगण्यावरून भारत (मेनन) हे करत आहे, जेणेकरून दोन-चीन परिस्थितीकडे तिला युएनचे लक्ष

वेधून घेता येईल.[108] सारांश असा, की तैवानच्या सामुद्रधुनीच्या पहिल्या पेचप्रसंगाच्या वेळेला भारताचे प्रयत्न चीनला उपयुक्त वाटले होते, पण दुसऱ्या संघर्षाच्या वेळेला मात्र भारत त्रयस्थ अथवा निष्पक्ष आहे, असे त्याला वाटत नव्हते.[109]

मध्यस्थ म्हणून भारतावर अवलंबून राहता येणार नाही, ही भावना अमेरिकेतही वाढीस लागली होती. दुसरा संघर्ष सुरू झाला, तेव्हा खाजगी पक्षाचा वापर करून घेण्याची कल्पना चर्चेस घेऊन अमेरिकेने फेटाळूनही लावलेली होती.[110] 1 ऑक्टोबर 1985 ला न्यू यॉर्क इथले भारताचे स्थायी सदस्य, आर्थर लाल यांनी अमेरिकेला सांगितले, की भारत दोन्ही पक्षांना एकमेकांची बाजू समजून घेता यावी याकरता अनौपचारिक दुभाषी देण्याची मदत करू शकतो. त्याचवेळी त्यांनी असेही कळवले म्हणे, की तैवानने ऑफशोअर बेटे रिकामी केली, तर चीन बळाचा वापर करणार नाही.[111] पण, ही शक्यता धूसर आहे, चीन असे काही करू इच्छित नाही, हे अमेरिकेला आधीपासूनच माहित होते. जॉन फॉस्टर ड्यूल्स यांनी मेनन आणि लाल यांच्या हेतूविषयीच चिंता व्यक्त केली.[112] 2 ऑक्टोबर, 1958 ला झालेल्या राष्ट्रीय सुरक्षा काउन्सिलच्या बैठकीत त्यांनी झोउ एन्लाय आणि आणखी एका नाव माहित नसलेल्या व्यक्तीमध्ये (बहुधा भारतीय राजदूत, पार्थसारथी) झालेल्या संभाषणाचा संदर्भ देऊन, ते "खोटे" असल्याचे सांगितले.[113] CIA संचालक, ॲलन ड्यूल्स यांचे मत होते, की चीनने स्वत:चे मत पुढे ढकलण्यासाठी भारताचा वापर केला आहे.[114] युएनच्या अमेरिकी गटाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या, की "मेनन यांना कोणत्याही पद्धतीचे प्रोत्साहन देऊ नका. सध्याच्या तैवानच्या सामुद्रधुनीच्या संघर्षात त्यांना किंवा भारताला मध्यस्थ म्हणून कोणतीही भूमिका नाही."[115] अमेरिकन स्टेट डिपार्टमेन्टने नवी दिल्लीतल्या अमेरिकी राजदूतालाही हाच निरोप दिला; त्याने भारत सरकारला स्पष्ट शब्दांत सांगायचे होते, की त्या वेळेला या संघर्षात अमेरिकेला कोणीही मध्यस्थ नको होता.[116]

ऐजेनहॉवर आणि ब्रिटिश परराष्ट्र सचिव, सेल्विन लॉईड यांच्या (21 सप्टेंबर, 1958) भेटीत झोउ आणि पार्थसारथी यांच्या भेटीचा वृत्तांत[117] कथन करून भारताला मध्यस्थ करण्याबाबत ब्रिटिशांनी अमेरिकेचा कानोसा घेतला. पण, अमेरिका या बाबतीत अनुकूल नाही, हे ब्रिटिशांच्या लवकरच लक्षात आले.[118] मग भारताचा वापर करून आशियाचे मत तैवानच्या बाजूने आणि PRC च्या विरोधात करावे असे उद्दिष्ट ब्रिटिशांनी ठेवले. सेल्विन लॉईड यांनी वॉशिंग्टन इथल्या त्यांच्या राजदूताला सांगितले की तैवानबद्दल भारताने बाजू मांडली, तर "फोर्मोसाच्या प्रश्नाबाबत योडगा काढताना त्याचा उपयोग होईलच, कारण तो प्रश्न आता सगळ्यात महत्त्वाचा होणार आहे, पण त्याचबरोबर त्यामुळे कम्युनिस्टांवर दबावही वाढेल."[119] प्रत्येकाची कारणे वेगवेगळी असली, तरी अमेरिका, चीन आणि ब्रिटन या सर्वांचे मत असे होते, की भारताची मध्यस्थी इष्ट नाही. त्यामुळे तैवानच्या सामुद्रधुनीतल्या दुसऱ्या संघर्षाच्या वेळेला भारताची भूमिका मर्यादित राहिली. तरीही, स्वत:च्या गरजांप्रमाणे आणि विदेशी आणि राष्ट्रीय सुरक्षा धोरणांनुसार भारताने दुसऱ्या संघर्षाच्या वेळेला घडामोडींवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला.

1950 च्या दशकात तैवानच्या सामुद्रधुनीत दोन वेळा संघर्षाची स्थिती उद्भवली. त्या वेळेला भारताने जी भूमिका निभावली, त्यातून काही महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतील.

पहिला म्हणजे, चीनचा तैवानवर सार्वभौम अधिकार आहे, याची नि:संदिग्ध मान्यता भारताने दिली, याचा अर्थ असा नाही, की भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी ही बाब बिनमहत्त्वाची झाली. उलट, 1950 च्या दशकातल्या परराष्ट्र धोरणासाठी या घडामोडी महत्त्वाच्या होत्या आणि त्या अनुषंगानेच ते धोरण आखले गेले. भारताने जी उद्दिष्टे ठरवली होती, त्यानुसारच त्याने त्यात लक्ष घातले आणि राजनैतिक मुत्सद्दीपणे कृती केली.

दुसरा म्हणजे, प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य राखणे हे प्राथमिक उद्दिष्ट होते. PRC आणि युनायटेड स्टेट्समधला तणाव वाढून त्या प्रदेशाच्या व्यापक शांततेवर आणि सुरक्षेवर अतिक्रमण झाले असल्यामुळे, भारताला असे वाटले की त्याचे हित जपण्यासाठी तैवान सामुद्रधुनीतल्या प्रश्नावर त्याला वाटणारी चिंता वैध आहे. थोडक्यात, जेव्हा जेव्हा त्यात गुंतलेल्या पक्षांमुळे ताण वाढेल आणि संभाव्य संघर्ष होण्याची शक्यता निर्माण होईल, तेव्हा तेव्हा तैवानच्या सामुद्रधुनीत जे काय होईल, तो भारताचाही प्रश्न असेल, असा पाया भारताने रचला.

तिसरा असा, की PRC आणि युनायटेड स्टेट्स या दोघांबरोबरही चांगले संबंध असल्यामुळे, थेट संवाद सुरू करण्यासाठी आणि तणाव कमी करण्यासाठी भारत आपले मधुर संबंध या कारणासाठी वापरू शकतो, असे भारताला वाटत होते. त्यायोगे भारत या प्रदेशातल्या स्वत:च्या धोरणात्मक

हितसंबंधांची जपणूकही करत होता. भारताने घेतलेला हा पुढाकार युनायटेड स्टेट्स (किंवा PRC देखील, ज्याने भारताचा फक्त स्वत:च्या फायद्यासाठी वापर करून घेतला) त्याच नजरेने का बघू शकत नाही हे भारताला समजू शकले नाही. आल्फ्रेड डी विल्हेल्म ज्यु. यांनी तैवानच्या सामुद्रधुनीतल्या पहिल्या संघर्षाचा अभ्यास केला होता. दोन देशांमधल्या दृष्टीकोनाची भिन्नता त्यांच्या शब्दांत अशी होती : "चीनप्रमाणे, भारतही शंभर वर्षांच्या पाश्चात्य प्रभावानंतर स्वत:ची राष्ट्रीय ओळख नव्याने प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील होता. या संवादामुळे आशियाच्या राजकारणात स्वत:चा सहभाग वाढवण्यासाठी भारताला संधी मिळाली. ड्यूल्स यांच्या दृष्टीने, भारताचे, विशेषत: कृष्ण मेनन यांच्या प्रयत्नांना चीनची फूस होती आणि त्यातून जी निष्पत्ती झाली असती, त्यातून युनायटेड स्टेट्सला कोणत्याही प्रकारचा फायदा होणार नव्हता. उलट, भारत एका बाजूला झुकलेला आणि पक्षपाती आहे असे अमेरिकेला (आणि 1958 नंतर चीनलाही) वाटत होते."[120]

चौथा म्हणजे, युनायटेड किंग्डम या तिसऱ्या बड्या आंतरराष्ट्रीय देशाची तिथली उपस्थिती आणि भारताशी त्याची असलेली जवळीक यामुळे भारताच्या कृतींवर त्या देशाचा फार मोठा पगडा होता. तैवान सामुद्रधुनीच्या प्रश्नात ब्रिटन थेटपणे गुंतलेला नव्हता, पण त्या प्रदेशात त्याचे मोठे हितसंबंध (हाँगकाँग आणि इतर कॉलन्या) गुंतलेले होते. दोन्ही पेचप्रसंगांच्या वेळेला भारत ब्रिटन सरकारच्याच सल्ल्यानुसार वागत होता. अशी सल्लामसलत फारशी गैर नसली, (1947 पर्यंत भारतावर ब्रिटनचे राज्य होते आणि त्यानंतर दोन देशांमध्ये चांगले संबंध होते) तरी भारतीय नेतृत्वाला हे समजू शकले नाही, की अती पूर्वेकडे युके स्वत:च्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करत आहे. भारताच्या धोरणाचा उघड वापर करून ब्रिटिश सरकारने अमेरिकेला कधीकधी स्वत:चा दृष्टीकोन समजावून दिला, तर अनेकदा ब्रिटनने भारताकरवी चीनवर स्वत:च्या कल्पना लादल्या. याचा परिणाम असा झाला असल्याची शक्यता आहे, की तिसऱ्या पक्षाची उद्दिष्टे आणि हितांचे रक्षण करताना भारताचे धोरण आणि स्वत:च्या भू-राजकीय उद्दिष्टांचा पाठलाग यांत विस्कळितपणा आला.

आणि शेवटचा म्हणजे, दोन्ही संघर्षांच्या वेळेला भारतीय मुत्सद्दीपणाशी जवळचा संबंध असलेले व्यक्तीमत्त्व, कृष्ण मेनन यांच्यामुळेदेखील भारतीय राजनैतिक प्रयत्नांवर परिणाम झाला असावा. कृष्ण मेनन यांचा 'इगो' आणि सतत उपदेश करण्याची वृत्ती यांवर अमेरिकेच्या संग्रहातल्या स्रोतांमध्ये अनेक उल्लेख केलेले आहेत[121]. अनेकदा अमेरिकेलाही असे वाटले, की चीनबद्दलच्या चर्चांमध्ये ते नेहरूंची दिशाभूल करत आहेत[122]. एका ठिकाणी, ड्यूल्स यांनी मेनन यांचे प्रयत्न "धोकादायक" आहेत[123], असे वर्णन केलेले आहे. ब्रिटिश परराष्ट्र सचिव, हॅरोल्ड मॅकमिलन यांनीही मान्य केले, की मेनन "गोंधळ वाढवत आहेत" आणि भारतीय बाजूवर फारसे अवलंबून राहता येणार नाही.[124]

1950 च्या दशकात भारताने तैवान प्रश्न कसा हाताळला यातून मिळालेले हे धडे आणि जेव्हा तो प्रश्न संपूर्ण आशियाला संघर्षाकडे घेऊन जाईल इतका मोठा झाल्यानंतर भारताची मुत्सद्दीपणाची वागणूक याचा आताच्या धोरणकर्त्यांना वापर करता येऊ शकतो. भविष्यकाळात तैवानच्या सामुद्रधुनीत परत पेच निर्माण झाला, तर भारताने तो कसा हाताळावा यावरही त्यातून मार्ग दिसू शकतो.

# भविष्यात तैवानच्या सामुद्रधुनीत पेचप्रसंग निर्माण झाला, तर भारतासमोर असणारे पर्याय

1950 मध्ये PRC ला राजनैतिक मान्यता हस्तांतरित केल्यानंतर शीत युद्धाच्या समाप्तीपर्यंत भारत आणि तैवानदरम्यान औपचारिक अथवा गुप्त संबंध नव्हते.[125] 1990 साली जेव्हा भारतासमोर आर्थिक संकट उभे राहिले होते, तेव्हा तैवानकडून गुप्तपणे आर्थिक मदत मागायच्या प्रस्तावावर विचार करण्यात आला होता (संपूर्ण जगात परकीय गंगाजळीचे सर्वाधिक साठे तैवानकडे आहेत), पण त्या बदल्यात तैवानला तेव्हा भारतात अधिकृत स्थानाची अपेक्षा होती, जी मान्य करणे शक्य नव्हते.[126] पण चीनशी संबंध सुरळीत झाल्यानंतर नवीन शक्यतांचे मार्ग खुले झाले आणि तैपेइबरोबर संबंध प्रस्थापित करण्याच्या कल्पनेवर भारत गांभीर्याने विचार करायला लागला. आय के गुजराल (जे पुढे परराष्ट्र मंत्री आणि भारताचे पंतप्रधानही झाले)

यांच्या नेतृत्वाखाली एका राजनैतिक शिष्टमंडळाने तैवानला भेट दिल्यानंतर पंतप्रधान पी व्ही नरसिंह राव यांना कळवले, की भारताने एक कार्यालय तिथे थाटले, तर मोठ्या प्रमाणावर देशाला तैवानकडून गुंतवणूक मिळू शकेल. 1994 साली राव यांनी वरिष्ठ मुत्सद्दी व्ही सी खन्ना यांना सांगितले, की तैपेइबरोबर आर्थिक संबंध स्थापन करणे हे भारताच्या हिताचे असेल, पण "आपण PRC शी असलेले आपले संबंध धोक्यात आणू शकत नाही."[127] राजनैतिक मुद्द्यांना मध्ये न आणता तैवानकडून गुंतवणूक आणि व्यापार आकर्षित करून घेण्याची जबाबदारी त्यांनी खन्नांवर सोपवली. भारत-तैपेइ असोसिएशन नावाची एक अधिकृत मान्यता नसलेली संस्था 1955 मध्ये स्थापन करण्यात आली आणि खन्ना तिचे प्रथम डायरेक्टर जनरल म्हणून नियुक्त करण्यात आले.[128]

प्रारंभीपासूनच, भारतीय धोरणकर्त्यांच्या वर्तुळात हे स्पष्ट होते, की 1950 साली तैपेइकडून बीजिंगकडे राजनैतिक मान्यता हस्तांतरित करण्याच्या धोरणावर भारत ठाम राहील. तैवानने वेळोवेळी अनेक प्रयत्न केल्यानंतरही ROC ला अधिकृत मान्यता देण्याचा प्रश्नच कधी उपस्थित झाला नाही. PRC नेही या घडामोडींवर आक्षेप घेतला नाही. 1995-96 मध्ये उद्भवलेल्या तैवान सामुद्रधुनीतल्या तिसऱ्या संघर्षाच्या वेळेला भारताने काहीही भाष्य अथवा कृती करण्याचे टाळले आणि चीनच्या अविश्वासाला पात्र होण्याचे एकही कारण त्याने चीनला दिले नाही.[129] त्यानंतरच्या वर्षांमध्येही दोन्ही देश आर्थिक विकासाने प्रेरित होते आणि डबल टॅक्सेशन, द्वीपक्षीय गुंतवणूक आणि नागरी हवाई वाहतूक करारावर दोन्ही देशांनी लक्ष केंद्रित केले. अधिक व्यापार, गुंतवणूक आणि मानवी संवादाच्या रचनेची उभारणी दोन्ही देशांनी केली. नवनवीन कल्पनांचा अंतर्भाव करून करार केले गेले आणि त्यात धोरणाला चिकटून राहणारी योग्य अशी भाषा वापरली गेली. 2003 साली, चीनच्या यशस्वी भेटीनंतर तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी डायरेक्टर जनरल या पदाला मान्यता दिली.[130] आर्थिक आणि व्यापारी संबंधात भराभर वाढ झाली, पण राजनीतीने प्रेरित कृती म्हणता येईल, अशा कोणत्याही कामापासून भारत सावधगिरी राखून लांब राहिला. 1995 पासून आलेल्या प्रत्येक राजनैतिक विचारधारेच्या सरकारने एक धोरण म्हणून हे स्वीकारलेले आहे.

2018 मध्ये परराष्ट्र खात्याच्या लोकसभेतल्या स्थायी समितीने चिंता व्यक्त केली, की "तैवान आणि तिबेटबाबत चर्चा करताना भारत चीनच्या संवेदनशीलतेबद्दल अतिशय जागरूक असतो, पण भारताच्या सार्वभौमतेच्या मुद्द्यांबाबत चीन तितका आदर कधीच दाखवत नाही. अरुणाचल प्रदेश असो, वा पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या काश्मीरमधला चीन-पाकिस्तान इकॉनमिक कॉरिडॉर असो, चीनने भारताशी चर्चा करताना संवेदनशीलता दाखवलेली नाही."[131] त्या अहवालात असेही लिहिलेले आहे, की

> भारताशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा करताना चीनचा मग्रूरीचा आविर्भाव असतो, हे वास्तव आहे. त्यामुळे, भारताने त्याच्या चीन-धोरणात जो आदरभाव पारंपरिकपणे अंतर्भूत केलेला आहे, तिच्याशी ही समिती सहमत राहू शकत नाही. चीनसारख्या देशाशी संबंध राखताना लवचिकता बाळगावी लागते. त्याचा भाग म्हणून सरकारने तैवानशी संबंध स्थापित करण्यासह सर्व पर्यायांचा विचार करावा असे समितीचे ठाम मत आहे.[132]

भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मुद्द्यांवर चीनने असंवेदनशील कृती केलेल्या आहेत. या कारणास्तव भारताने त्याच्या तैवान-धोरणाची फेरआखणी करावी, असे धोरणात्मक समुदायातल्या काही जणांचे मत आहे.[133]

भारताने कोणत्या परिस्थितीत PRC ला राजनैतिक मान्यता दिली होती, याचा आढावा धोरणाचे पुनर्मूल्यांकन अथवा फेरआखणी करताना घेणे आवश्यक आहे. त्या वेळेला फायदा-तोट्याचे विश्लेषण करताना भारतासमोर अन्य कोणता पर्यायच नव्हता. शेजारच्या प्रदेशावर सरकारने संपूर्ण ताबा मिळवलेला होता, तो ताबा उलथवून टाकला जाईल, अशी कोणतीही शक्यता दिसत नव्हती. अशा वेळी त्या सरकारला पाठिंबा दर्शवला नसता, तर ते भारताच्या हितासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी हानीकारक ठरले असते. भारताच्या व्यापक प्रादेशिक हिताचा आणि आंतरराष्ट्रीय संदर्भातून विचार करताना, चीनशी असलेले चांगले संबंध फायदेशीरच ठरणार होते. हा एक धोरणात्मक निर्णय होता.[134] अर्थात, धोरणात बदलही होऊ शकतातच. सद्य धोरणापासून फारकत घेतली, तर बऱ्यापैकी प्रत्युत्तर मिळण्याची शक्यता आहे, कारण चीनसाठी हा विषय नेहेमीच धगधगता आहे. त्यामुळे, मान्यतेसंबंधी प्रश्नाच्या धोरणात बदल केला, तर भारताच्या भू-राजकीय स्थितीला त्याने काय फरक पडेल, आणि त्यातून मिळणारे फायदे हे त्यातल्या धोक्यांपेक्षा अधिक असतील का?

आणखी एका प्रश्नाचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. 1949 साली PRC कडे राजनैतिक मान्यता हस्तांतरित करताना भारताने "एक चीन" (One China) धोरणाला विशेषकरून मान्यता दिली होती का? PRC ला राजनैतिक मान्यता देताना ज्या वाटाघाटी झाल्या, तेव्हा ROC शी अधिकृत संबंध ठेवले जाणार नाहीत किंवा चीनचा प्रतिनिधी म्हणून तैवानला युएनमध्ये पाठिंबा दिला जाणार नाही हे भारताने मान्य केले होते.[135] पण नेहरू[136] आणि झोउ एन्लाय[137] यांच्यामध्ये जी अधिकृत चर्चा झाली, त्यात PRC ला राजनैतिक मान्यता देताना 'एक चीन' धोरणाबद्दल कोणताही उल्लेख करण्यात आला नव्हता. हेही वास्तव आहे, की डिसेंबर, 1988 मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या भेटीत (आणि डिसेंबर, 1991 मध्ये चीनचे अध्यक्ष ली पेंग यांनी भारताला दिलेल्या उलट-भेटीत) जेव्हा संबंध सुरळीत झाले, तेव्हाही दोन्ही देशांनी प्रसृत केलेल्या संयुक्त संदेशात "एक चीन"चा संदर्भ नव्हता. 30 नोव्हेंबर, 1996 या दिवशी भारत-चीन संयुक्त घोषणेत सर्वप्रथम "एक चीन"चा संदर्भ होता; त्या वेळी चीनचे अध्यक्ष जिआंग झेमिन भारतभेटीला आलेले होते.[138] भारताने 1995 मध्ये तैपेइमध्ये अनौपचारिक कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला होता; त्या निर्णयाने धोरणात कोणताही बदल झालेला नाही, असे PRC ला आश्वस्त करणे हे त्यामागचे कारण असे असेल. तरीही एका दशकानंतर (या काळात कमीतकमी आणखी चार वेळेला संयुक्त निवेदने सादर केली गेली, ज्यांमध्ये अशा प्रकारचे संदर्भ दिले गेले होते) 2009 सालापासून "एक चीन" असा उल्लेख करणे भारताने थांबवले. सार्वभौमत्व आणि प्रादेशिक निष्ठा या मुद्द्यांवर चीन भारताप्रती संवेदनशलता दाखवत नाही, हे त्यामागचे कारण होते.[139] 2014 साली सद्य शासनाने (तत्कालीन परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्याद्वारे) असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे, की "भारताची "एक चीन" धोरणाला मान्यता हवी असेल, तर चीननेही "एक भारत" धोरणाला आपला पाठिंबा जाहीर करावा."[140] "एक चीन" असा औपचारिक उल्लेख न करण्याचे हे धोरण, PRC ला मान्यता हस्तांतरित करताना आणखी स्पष्टीकरणाची आवश्यकता नाही, या भारत सरकारच्या मूळ स्थिती आणि हेतूशी सुसंगतच आहे. त्यामुळे, या पुढेही भारताने "एक चीन" धोरणाबद्दचा कोणताही संदर्भ कोणत्याही एकल अथवा संयुक्त निवेदनांमध्ये अथवा संदेशांमध्ये देऊ नये.

PRC चा तैवानवर सार्वभौम हक्क आहे हे अधिकृतपणे मान्य करणे याचा अर्थ भारत आणि तैवानदरम्यान व्यापार, व्यवसाय होऊ शकत नाही अथवा सांस्कृतिक आणि शैक्षणिक देवाणघेवाण होऊ शकत नाही, असे नाही. तैवानच्या पहिल्या डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी सरकारचे अध्यक्ष चेन शुई-बिआन (2000-08) यांनी "Go South" धोरणाची घोषणा केली, ज्यात भारताचा समावेशही त्यांनी केला होता. तैवानमधून गुंतवणूक यावी, यासाठी कर, गुंतवणूक आणि नागरी वाहतुकीसंबंधी अनेक करार केले गेले. इलेक्ट्रॉनिक्स, संगणक आणि सेमीकंडक्टर क्षेत्रामधल्या कंपन्या आकर्षित करून घेण्याचे प्रयत्न केले गेले. पण फारशा गुंतवणुकी होऊ शकल्या नाहीत, कारण त्यांचा वापर करून राजनैतिक मान्यता मिळवण्यात तैवानला अधिक रस होता, आणि त्याचबरोबर भारतही पुरेशा आकर्षक सोयी आणि सवलती देण्यात कमी पडला. PRC, मलेशिया आणि थायलंडमध्ये जे गुंतवणुकीसंबंधी वातावरण होते, त्याची तुलना तैवानने भारतातल्या वातावरणाशी केली, तेव्हा तैवानच्या अपेक्षेत बसण्यासाठी भारत कमी पडला. 2016 मध्ये अध्यक्ष त्साई इंग-वेन यांच्या सद्य सरकारने नवीन दक्षिण धोरण तयार केले, ज्यात आग्नेय आशियाचाही समावेश होता.[141] या धोरणात व्यापारी देवाणघेवाण, कौशल्य आदानप्रदान, संसाधने वाटून घेणे आणि प्रादेशिक सुसंवाद यांवर भर होता. या वेळेला, चीनच्या वागणुकीमुळे भारतावर अधिक भर देण्यात आलेला आहे. भारताबरोबर अधिकाधिक आर्थिक संबंध निर्माण करावेत आणि तैवानकडूनही तितकीच आर्थिक गुंतवणूक व्हावी यावर भर देण्यात आलेला आहे. पण या प्रयत्नांमध्ये आपोआप यश मिळणार नाही. शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करून भारताने पाठिंबा कायम ठेवण्यावर ते अवलंबून असेल.

1950 मध्ये भारताने PRC ला मान्यता दिल्यानंतरदेखील भारत सरकारने सामुद्रधुनीतल्या घडामोडींवर आपले लक्ष कायम ठेवले. उलट, 1950 च्या दशकात भारताच्या विदेश धोरणात तैवान प्रश्न केंद्रस्थानी होती. या लेखाच्या दुसऱ्या भागात त्याबद्दल लिहिलेले आहे. सगळ्या घडामोडींकडे भारताचे बारीक लक्ष होते आणि आवश्यक होते तेव्हा भारताने मुत्सद्दीपणाने मध्यस्थीही केली. कार्नेगी एन्डोवमेन्ट फॉर इंटरनॅशनल पीस या संस्थेने केलेल्या अभ्यासात असे निष्पन्न झाले, की "एक चीन" तत्त्वाचा वापर करून चीन तैवान प्रश्नाभोवती इतर देशांचे धोरण निश्चित करतो.[142] तैवानवर आपला वैध हक्क आहे आणि नैतिकतेलाही धरून आहे असे चीन दाखवायचा प्रयत्न करतो. त्यामुळे, तैवानशी निगडित जे काही होईल, तो द्वीपक्षीय मुद्दा आहे आणि इतर कोणीही त्यात लक्ष घालायचे कारण नाही, असा दबावही चीनकडून टाकला जातो. चीन आणि तैवान एक होताना कोणताही बाह्य हस्तक्षेप त्यात होणार नाही याची काळजी PRC घेत आहे. भारतासह इतर कोणीही तसे केले, तर ते त्याच देशाच्या धोरणाच्या विरुद्ध असेल याची जाणीव त्यांना करवून देण्याचे काम PRC करत आहे.[143] पण 1950 साली तैवान सामुद्रधुनीत शांतता आणि स्थैर्य असावे या मुद्द्यातून भारताने सार्वभौमत्व हा मुद्दा

वेगळा काढला होता. नेहरूंनी शब्दांत आणि कृतीतूनही हे स्पष्ट केले होते, की "जेव्हा [तैवान सामुद्रधुनीशी निगडित] एखादी समस्या किंवा निर्णय यांमुळे एखादे युद्ध किंवा शांतता निर्माण होऊ शकते, जेव्हा ते युद्ध संपूर्ण जगात पसरू शकते, तेव्हा ती एक स्थानिक, प्रादेशिक किंवा खंडीय समस्या उरत नाही- ती एक जागतिक समस्या होते."[144] त्यामुळे, 'तैवानच्या सामुद्रधुनीत जे काही होते, त्यात भारताला स्वारस्य आहे', हे आपोआपच अधोरेखित होते. आजच्या संदर्भातही हे धोरण कायम आहे, कारण तैवानच्या सामुद्रधुनीत तणावामुळे संघर्ष झाला, तर त्याचे फार मोठे आणि गंभीर परिणाम भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवरही होतील.

तैवानच्या सामुद्रधुनीत तणाव निर्माण झाला, तर भारताने काहीही कृती करू नये यासाठी चीन शक्य तितका दबाव टाकेल, अशी अपेक्षा आपण नक्कीच करू शकतो. "एक चीन" तत्त्वाचा भाग बाजूला काढला, तर भारत त्या प्रदेशाचाही भाग नाहीये आणि त्यामुळे तिथे जे काही होते, त्याच्याशी भारताचा काहीही संबंध नाही, असेही चीन म्हणू शकतो. पण आग्नेय आशिया आणि हिंद महासागराच्या उत्तर भागात जेव्हा तणावाचे प्रसंग उद्भवले, तेव्हा PRC ने वेळोवेळी हस्तक्षेप केलेला आहे. भारत आणि त्याचे शेजारी देश यांच्यामध्ये तणाव असेल, तर प्रादेशिक स्थैर्याला धक्का बसतो आणि त्यामुळे चीनसह इतर देशांना त्याबद्दल चिंता वाटणे साहजिकच आहे, असा दावा त्या वेळेला PRC ने केलेला आहे.[145] हाच दावा पुढे नेऊन, जेव्हा सामुद्रधुनीतल्या ताणाचा परिणाम प्रादेशिक शांतता आणि सुरक्षेवर होतो, तेव्हा चिंता व्यक्त करायचे आणि राजनैतिक कृती करायचे वैध कारण भारताला मिळते, असे भारतही म्हणू शकतोच. एकूण चीन धोरणाबद्दल भारताने अनेक दशके स्वत:वरच बंधने लादून घेतली होती. 12 ऑगस्ट, 2022 ला हे चित्र बदलले. अमेरिकेच्या सरकारच्या प्रवक्त्या, नॅन्सी पेलोसी यांनी तैवानला भेट देण्याचा निर्णय घोषित केल्यानंतर चीनने तैवानच्या सामुद्रधुनीत लष्करी हालचाली सुरू केल्या. भारताने या घडामोडींवर चिंता व्यक्त केली. हे निवेदन समतोल शब्दांत होते आणि त्यात गुंतलेल्या सर्वच संबंधित पक्षांनी "संयम बाळगावा, जैसे-थे स्थिती बदलण्याचे एकतर्फी निर्णय घेऊ नयेत, तणाव कमी करावा आणि प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य राखावे" असे आवाहन करण्यात आले होते.[146] यापुढेही तैवानच्या सामुद्रधुनीचे स्थैर्य बिघडवणाऱ्या पक्षांबद्दल भारताने सतत आणि थेट शब्दांत चिंता व्यक्त करत राहिली पाहिजे.

अंतर्गत सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तैवान प्रश्नाचे गांभीर्य बघता, भारताच्या परदेश धोरणात तैवान सामुद्रधुनीच्या प्रश्नाचा केवळ अंतर्भाव करणे पुरेसे होणार नाही. अंतर्गत घडामोडी (2024 मध्ये तैवानचे सरकार बदलण्याची शक्यताही गृहित धरायला हवी), PRC आणि तैवानमध्ये सामुद्रधुनीसंबंधीचे खटके आणि PRC, युनायटेड स्टेट्स आणि तैवान या त्रिकोणातली समीकरणे यांचा सखोल अभ्यास तातडीने करायला हवा. तैवान संघर्षाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ शकणारा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम कमी करायचा असेल, तर त्यात धोके कोणते आहेत आणि ते कमी करण्यासाठी काय करायला हवे याचे संपूर्ण सरकारी पातळीवरून राष्ट्रीय सुरक्षा काउन्सिल सेक्रेटेरियटने मूल्यांकन करायला हवे. या मूल्यांकनाच्या आधारावर भारत सरकार आकस्मिक योजना तयार करू शकते आणि या योजना राबवताना जे अडथळे निर्माण होऊ शकतात, त्यांचाही आढावा घेऊ शकते. जर भारताची अंतर्गत अर्थव्यवस्था त्याचे परिणाम भोगण्यासाठी सशक्त नसेल किंवा त्याची तयारी अपुरी असेल, तर रशिया-युक्रेन युद्धाच्या परिणामांपेक्षाही गंभीर परिणाम भारतावर होतील.

जर संघर्ष अटळ आहे असे वाटले, तर प्रादेशिक शांतता आणि सुरक्षा कायम राखण्याकरता कोणत्या पद्धतीची कृती राजनैतिक पातळीवरून करता येईल याचा निर्णय भारताला घ्यावा लागेल. 1950 मध्ये सरकारचा असा दृष्टीकोन होता, की प्रादेशिक शांतता राखणे हे भारताच्या मूलभूत हिताचे आहे. हा दृष्टीकोन योग्यच होता. पण एका बाजूला स्व-हिताचा विचार करताना दुसऱ्या बाजूने योग्य आणि नैतिक काय आहे याचा विचार केल्यामुळे, भारताचे धोरण थोडे गोंधळले. यात राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले मुद्दे आणि 1950 च्या दशकात भारतीय मुत्सद्दीपणाचा चेहरा असणारे व्ही. के. कृष्ण मेनन यांचे व्यक्तिगत मुद्दे एकत्र आले. ही गल्लत म्हणजे भारताने केलेली चूक होती. आशिया-पॅसिफिक प्रदेशात चीन भारताचा भागीदार होईल आणि PRC आणि युनायटेड स्टेट्स या दोन्ही देशांशी असलेल्या चांगल्या संबंधांमुळे भारत राजनैतिक मध्यस्थ म्हणून काम करू शकेल असा समज जर 1950 च्या दशकात असेल, तर 2020 ची परिस्थिती मात्र पूर्णपणे बदललेली आहे. युनायटेड स्टेट्सबरोबर भारताची बहुआयामी आणि धोरणात्मक भागीदारी आहे. पण दुसरीकडे, PRC मात्र भारताला "त्रयस्थ" समजत नाही, तो युनायटेड स्टेट्सच्या दिशेने कललेला आहे, असे त्याचे मत आहे.[147] इतरांचे मूल्यमापन त्यांच्या कृतीतून करण्याचे बीजिंगचे धोरण असल्यामुळे, बीजिंगच्या कृतीही काय आहेत ते पाहणे योग्य ठरावे- 2017 पासून चीन LAC लगत हालचाली करत आहे, सीमाभागात त्याने मोठ्या प्रमाणावर लष्करी फौजफाटा तैनात केलेला आहे[148] आणि नवी दिल्लीतले आधीचे चिनी राजदूत ऑक्टोबर, 2022 मध्ये चीनला परत गेल्यानंतर बीजिंगने नवीन राजदूताची नियुक्ती केलेली नाही. या कृतींमधून हे स्पष्ट होते, की चीन भारताला

पक्षपाती आणि उपद्रवी समजतो. या परिस्थितीत भविष्यातला संघर्ष टाळण्यासाठी दोन मुख्य पक्षांमध्ये राजनैतिक स्तरावरून कृती करण्याचा प्रयत्न व्यवहार्य नाही. तैवानच्या सामुद्रधुनीत ताण निर्माण न होणे आणि तिथली शांतता ढवळून न निघणे हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हिताचे आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारच्या राजनैतिक कृती, एकेकट्या अथवा एकत्र तयार करणे आवश्यक आहे.

भारताने कोणती कृती, किती प्रमाणात त्याच्या भागीदारांसमवेत करायची याचा निर्णय धोरणकर्ते घेतील. तैवानच्या सामुद्रधुनीत प्रत्यक्ष ताण किती निर्माण झाला आहे आणि त्याची व्यापकता किती आहे, यावर ते अवलंबून असेल. अमेरिकन विचारवंतांनी केलेल्या एका अलीकडच्या अभ्यासानुसार, सिंगापूर, व्हिएतनाम, थायलंड आणि भारत यांना "चीनच्या आक्रमणाची चिंता वाटेल, पण त्यांना चिनी लष्कराचे भयही वाटते. युनायटेड स्टेट्स आणि तैवान यांच्याप्रती त्यांना सहानुभूती वाटेल, पण स्वत:वर ते चिनी हल्ला होऊ देण्यासाठी तयार नसतील. त्यामुळे ते अप्रत्यक्ष मदत करतील; ते अमेरिकी विमानांना त्याच्या हवाई हद्दीतून जाण्याची परवानगी देतील, मध्ये थांबादेखील पुरवतील, पण स्वत: संघर्षात भाग घेणार नाहीत, अथवा त्यांच्या भूमीवरून हल्ला करण्यासाठी परवानगी देणार नाहीत.[149] तैवानविरुद्ध PRC ने हाती घेतलेल्या आक्रमक कृतींना प्रादेशिक पातळीवरून किती प्रतिबंध केला जाईल याचा अभ्यास युरोपीय चमूने 2023 च्या म्युनिक सुरक्षा परिषदेतही केला, तेव्हाही त्यात भारताचा उल्लेख टाळलेला होता. या आढाव्यांमधून हे स्पष्ट होते, की सामुद्रधुनीत संघर्ष उफाळून आला, तर भारत नेमकी काय कृती करेल याबाबत उर्वरित जगात संभ्रम आहे.[150] या बाबतीत भारताचा भागीदारांना स्पष्टता असणे आवश्यक आहे, जेणेकरून भारताच्या स्थितीबद्दल कोणालाही गैरसमज निर्माण होणार नाहीत.

यात गुंतलेले जे दोन प्रमुख पक्ष आहेत, ते भारताकडून कोणत्या कृतीची अपेक्षा करत असतील याचे अंदाज वर्तवणे हे प्राधान्याने आणि ताबडतोब केले पाहिजे.

PRC चा विचार केला, तर भारताने त्रयस्थ रहावे, अशी त्याने नेहेमीच अपेक्षा केलेली आहे, पण त्याचबरोबर, तो युनायटेड स्टेट्सकडे झुकेल असेही त्याने गृहित धरलेले आहे. त्यामुळे हे झुकणे कमी करणे, अथवा त्याला पूर्णपणे प्रतिबंध करणे यासाठी तो प्रयत्न करेल, जेणेकरून दुसऱ्या आघाडीवर आव्हान मिळण्याची शक्यता कमी होईल. समोर उभे ठाकणे (प्रचंड मोठी लष्करी ताकद जमा करणे किंवा अण्वस्त्रांवर निशाणा धरणे), (एकट्याने किंवा पाकिस्तानबरोबर) LAC लगत आक्रमक हालचाली करणे, किंवा टोकाला जाऊन मर्यादित प्रमाणावर दंडात्मक हल्ला करणे अशी कोणतीही कृती चीन करू शकतो. या सर्व शक्यता गृहित धरून, चीनने यापैकी कोणतीही कृती केली, तर प्रत्येक पायरीवरून भारत नेहमी कोणती कृती करेल याची रणनीती भारतीय धोरणकर्त्यांनी आखणे गरजेचे आहे. सीमाभागातल्या पायाभूत सुविधा आणि एकूण राष्ट्रीय ताकद यांमध्ये भारत आणि चीनमध्ये असमानता आहे. नजीकच्या भविष्यकाळातही हे चित्र बदलणार नाही. त्यामुळे, तैवानच्या सामुद्रधुनीतल्या संघर्षात युनायटेड स्टेट्सची बाजू घेण्यापासून भारताला रोखण्याकरता करड्या पातळीचे युद्ध (gray-zone warfare) छेडावे असे चीनला वाटण्याची शक्यता असेल, तर भारतालाही सीमेवर मोठ्या तणावाचा सामना करायची तयारी ठेवावी लागेल. 1950 च्या संघर्षाच्या वेळेचा एक महत्त्वाचा धडा आठवणे इथे उचित ठरेल- चीनला एकाच वेळी अनेक आघाड्यांवर युद्धाचा धोका पतकरायचा नाहीये.[151] चीनदेखील असुरक्षित आहे, याची आठवण भारताने त्याला करून द्यावी. केवळ भारताने युनायटेड स्टेट्सच्या बाजूला झुकू नये म्हणून त्याला प्रतिबंध करण्यासाठी चीन जर नैऋत्य सीमेवर युद्ध छेडत असेल, तर या संघर्षाची जबाबदारीही चीनला त्याच्याच खांद्यावर घ्यावी लागेल, त्यापासून त्याची सुटका होऊ शकणार नाही.[152] भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका उत्पन्न होणार असेल, तर सर्व पर्याय खुले हवेत. अर्थात, ही फार टोकाची परिस्थिती झाली. तैवानच्या सामुद्रधुनीत शांतता आणि स्थैर्य कायम रहावे हेच अंतिम उद्दिष्ट असेल. त्यामुळे, सर्व पर्याय खुले ठेवून भारताने संघर्षाची शक्यताच कमी करण्याचे प्रयत्न करायला हवेत.

युनायटेड स्टेट्सने असे गृहित धरले आहे, की चीनने तैवानवर हल्ला केला, तर भारताची स्थिती द्विधा होईल. एका बाजूने तैवानवर ताबा मिळवून चीनची स्थिती अधिक मजबूत होणे भारताला नको असल्याने तो युनायटेड स्टेट्सबरोबर राहील. पण प्रत्यक्ष सहभाग घेतला, तर त्यातून जे धोके निर्माण होतील त्यापासून भारताला सावध रहावे लागेल. (थेट धोका नसेल, तर) भारत संघर्षात प्रत्यक्ष सहभाग घेणार नाही, पण तरी युनायटेड स्टेट्स भारताकडून थोड्या सहकार्याची अपेक्षा ठेवेल. एका CSIS पेपरच्या निरिक्षणानुसार, युक्रेनमध्ये झाले तसे तैवानमध्ये युनायटेड स्टेट्स मोठ्या प्रमाणावर लष्कर तैनात करू शकणार नाही, किंवा एकदा संघर्ष सुरू झाला, की तिथे आपली फौज उतरवू शकणार नाही किंवा साधने आणि सामग्री पोचवू शकणार नाही. याचाच अर्थ असा, की संघर्ष सुरू होण्याच्या आधीच युनायटेड स्टेट्सला आवश्यक त्या सर्व कार्यकारी सुविधा तैनात कराव्या लागतील. त्या अहवालानुसार, की संघर्ष सुरू होताच चिनी प्रक्षेपक युनायटेड स्टेट्सने आधीपासून तैनात केलेली विमाने आणि जहाजे नष्ट करतील.[153] त्यामुळे, अमेरिकेला चिनी हल्ल्याला

तोंड देणारी आणि भौगोलिकदृष्ट्याही सुरक्षित युद्धसामग्री संघर्ष सुरू होण्याआधी तैनात करावी लागेल. युनायटेड स्टेट्ससाठी हे करणे अतिशय महत्त्वाचे असेल. त्यामुळे युनायटेड स्टेट्स यासाठी भारताची मदत मागेल, कदाचित अंदमान आणि निकोबार बेटांचा वापर यासाठी करण्याची मागणी करेल. PRC ला हे मान्य होणार नाही. संघर्ष सुरू होण्याआधीच युनायटेड स्टेट्स कोणकोणत्या पायऱ्यांवरून दबाव टाकणे सुरू करेल आणि संघर्ष सुरू झाल्यानंतर वॉशिंग्टन नवी दिल्लीकडे कोणत्या मागण्या करेल याची स्पष्ट कल्पना भारताला असणे गरजेचे आहे. त्यासाठी युनायटेड स्टेट्सचे उद्दिष्ट, धोरण आणि धोरणात्मक अपेक्षा समजून घ्यायला हव्या.

या कारणासाठी, भागीदारांशी सर्व स्तरांवरून चर्चा करताना तैवानचा मुद्दा आणायला हवा. चीनला आव्हान देण्यातले धोके आणि फायदे यांबद्दल भारत आणि त्याच्या भागीदारांमध्ये मतभेद असतीलच, पण संघर्षाच्या काळात नाही, तर आत्ता शांतता असतानाच भागीदारांच्या अपेक्षा आणि त्यांच्याबरोबर कोणत्या मुद्द्यांवर एकमत आहे आणि कोणत्या मुद्द्यांवर मतभेद आहेत याची स्पष्ट कल्पना असेल, तर तैवानच्या सामुद्रधुनीत संघर्ष उद्भवल्यावर काय प्रकारची तयारी आधीपासूनच करून ठेवावी लागेल, याबद्दल महत्त्वाची माहिती मिळेल. भागीदारीमध्ये एकत्रित कृती आणि व्यवस्था यांचा समावेश करावा लागेल. द्वीपक्षीय भागीदारांबरोबर संवाद साधण्यासाठी रचना करणे आणि तैवानसंबंधी समान उद्दिष्टे असणाऱ्या युरोपीय देशांबरोबरदेखील संवादात सामावून घेणे इष्ट ठरेल. तैवानने स्वातंत्र्यासाठी कोणतीही मागणी न करता केवळ जैसे-थे स्थिती रहावी यासाठी प्रयत्नशील राहणे हे भारताचे उद्दिष्ट आहे.[154] ASEAN चेही हेच उद्दिष्ट असल्याने, त्या देशांशीही तातडीने संवाद प्रस्थापित केला जावा. तसेच, अखंडित देखरेख आणि या मुद्द्यात स्वारस्य असणाऱ्या विदेशी पक्षांशीही नियमितपणे संवाद आवश्यक आहेत, जेणेकरून भारताची स्थिती मजबूत राहील.

युरोपियन युनियनबरोबर समान पातळीवर येण्यासाठी भारताने खालील पायऱ्यांचा अवलंब करण्याबाबत विचार करावा. प्रथम, दोघांनीही आपली निवेदने एकसारखी ठेवायला हवीत; यातून असा संदेश जाईल, की भारताच्या चिंतांशी इतर देशही सहमत आहेत. दुसरे म्हणजे, तैवानच्या सामुद्रधुनीत संघर्ष उफाळून आला, तर त्यांच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा काय परिणाम होईल याबाबत हिंद-प्रशांत प्रदेशातल्या उर्वरित देशांमध्ये आणि विशेषत: संपूर्ण दक्षिणेत दोघांनीही जागृती करावी. हिंद महासागर आणि आफ्रिकेतल्या अनेक देशांना या संघर्षाच्या होणाऱ्या परिणामांची कल्पनाच नाहीये. त्यांना परिस्थितीचे वास्तव कथन केले, तर या भागात शांतता आणि स्थैर्य कायम रहावे यासाठी प्रयत्नशील असलेला भारत आणि इतर देशांच्या आवाजात हे देशही त्यांचा आवाज मिसळतील. तिसरे म्हणजे, धोका कमी करण्यासाठी (स्वत:ला त्यापासून लांब ठेवण्यासाठी नाही) दोघांनाही फायदेशीर ठरतील असे कोणते उपाय योजता येतील याबद्दल EU बरोबर भारताने विशिष्ट चर्चा करायला हवी. चीनवर असलेल्या मोठ्या प्रमाणावरचे अवलंबत्व कमी करण्यासाठी युरोपीय व्यवसाय पर्यायी गुंतवणूक-देश शोधत आहेत. भारताशी संभाव्य भागीदारी होऊ शकते, असे संकेत भारताने द्यायला हवेत. हे होण्यासाठी, तैवानच्या सामुद्रधुनीत कोणते संभाव्य धोके आहेत, याबाबत दोन्ही बाजूच्या धोरणकर्त्यांमध्ये संवाद होणे गरजेचे आहे. चीन याबाबत काय विचार करेल, या चिंतेमुळे हिंद-प्रशांत प्रदेशातले ASEAN आणि इतर सत्ता याबाबतीत पावले टाकण्यासाठी कदाचित तयार होणार नाहीत. त्यांच्याशी संतुलित संवाद साधता आला तरीही खूप फायदा होऊ शकेल, कारण या संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक सुरक्षा आणि भरभराटीसाठी तैवानच्या सामुद्रधुनीत शांतता आणि स्थैर्य असणे गरजेचे आहे. तैवानच्या सामुद्रधुनीची परिस्थिती चिघळण्याबाबत जितके अधिक देश एकत्रितपणे बोलतील, तितकाच वैश्विक पातळीवरही विरोध वाढेल आणि संघर्ष करण्यावर ठाम असलेल्यांना कदाचित प्रतिबंध करता येऊ शकेल.

आणि अखेर, दोन्ही सत्ता समेटासाठी तयार व्हाव्यात याकरता विविध शक्यतांचा विचारही करावा लागेल. CSIS अभ्यासाचा असा निष्कर्ष होता, की स्थितीतला तणाव वाढणे, लांबणे किंवा कोणताही तोडगा न निघणे यापैकी काहीही झाले, तर युनायटेड स्टेट्सचा धोरणात्मक पातळीवरून भ्रमनिरास होईल. विशेषत:, जर चीन-अमेरिका संघर्षाचा जर निर्णायक शेवट होणार नसेल [155], तर त्यासाठी मोजावी लागणारी मानवी, वित्तीय आणि लष्करी किंमत देऊन तैवानचा बचाव करणे हे खरोखर गरजेचे होते का, असा प्रश्न विचारला जाऊ शकेल. हे लक्षात ठेवले पाहिजे, की 1959 ते 1962 या काळात PRC आणि युनायटेड स्टेट्स यांच्यामधली समीकरणे झटकन बदलली होती आणि भारत निष्कारण उघडा पडला होता. शिवाय, 1950 मध्ये आणखी एका मोठ्या सत्तेने (युनायटेड किंग्डम) स्वत:चे हित राखण्यासाठी भारताचा दृष्टीकोन ठरवण्याचा आणि त्याच्या निर्णयावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला होता, हेही विसरता कामा नये.

# तात्पर्य

प्रशांत महासागराच्या पश्चिम भागात PRC आणि युनायटेड स्टेट्समधले वाढते शत्रुत्व दीर्घकाळासाठी राहील अशी चिन्हे आहेत. संभाव्य संघर्ष हा तैवानच्या मुद्द्यावरून होण्याची सर्वाधिक शक्यता आहे. तैवानच्या सामुद्रधुनीत कोणत्याही प्रकारचा संघर्ष झाला किंवा तणावही निर्माण झाला तर भारताच्या आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या हितावर त्याचे गंभीर परिणाम होतील. भारताच्या व्यापारावर आणि पुरवठा साखळीवर अवलंबून असणाऱ्या आयात क्षेत्रांवर (औषधनिर्माण, इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर) त्याचा प्रचंड आणि ताबडतोब परिणाम होणार आहेच, पण जागतिक जहाज उद्योग, वाहतूक विम्याच्या वाढत्या किंमती आणि माहितीच्या देवाणघेवाणीत येणारे अडथळे यांमुळे बेरोजगारी वाढून भारताच्या तिजोरीवर त्याचा प्रचंड ताण वाढेल. त्याशिवाय, भारताकडून धोका आहे असे चीनला वाटले, तर LAC लगत तो आणखी एकदा लष्करी कारवाई करण्याची शक्यताही आहेच.

त्यामुळे, तैवानच्या सामुद्रधुनीत जे काही होईल, ते भारताच्या विदेश आणि राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा अविभाज्य भाग असणे आवश्यकच आहे. संभाव्य संघर्षाचा भारतीय अर्थव्यवथेवर काय परिणाम होईल याचे तातडीने मूल्यमापन करून, तो परिणाम कमीतकमी व्हावा याकरता काय प्रयत्न करता येतील, यावरही विचार करावा लागेल. हे मूल्यमापन करण्यात चालढकल केली, तर त्याची मोठी किंमत चुकवावी लागेल, कारण देशाच्या अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर कडक बंधने घालावी लागतील आणि चीन आणि पूर्व आशियावरचे अवलंबत्व कमी करायचे असेल, तर त्यासाठी पुरेसा वेळ द्यावा लागेल. त्यासाठी संपूर्ण सरकारी यंत्रणेचे सहकार्य आणि प्रयत्न आवश्यक असतील.

तैवानच्या सामुद्रधुनीत शांतता आणि स्थैर्य कायम राहील हे पाहणे भारताच्या धोरणात्मक हिताचे आहे. त्यासाठी भारताने राजनैतिक पातळीवर मोठे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यात गुंतलेल्या दोन्ही प्रमुख पक्षांकडे आपली चिंता व्यक्त करणे आणि त्याच वेळेला आपल्या भागीदारांसमवेत रचनात्मक सल्लामसलत करणे चालू ठेवावे लागेल, जेणेकरून त्यांच्या हेतूंविषयी स्पष्ट कल्पना येईल, आणि संघर्ष उद्भवला, तर विविध परिस्थितीमध्ये भारत काय निर्णय घेईल हे त्यांना कळवता येईल. आणि अखेरीस, संभाव्य संघर्षाची तयारी करताना चीन आणि युनायटेड स्टेट्सच्या भारताकडून ज्या अपेक्षा असतील, त्यांनी यादी तयार करणे आणि दोन्ही बाजू भारतावर दबाव टाकायला लागल्या, तर काय प्रतिक्रिया (चढत्या क्रमाने) द्यायच्या याचीही भारताला तयारी करावी लागेल.

# लेखकाविषयी

**विजय गोखले** हे कार्नेगी इंडियाचे नॉन रेसिडेंट सिनियर फेलो आहेत. एकोणचाळीस वर्षांच्या मुत्सद्देगिरीच्या कारकीर्दीनंतर जानेवारी, 2020 मध्ये ते भारतीय परराष्ट्र सेवेतून निवृत्त झाले. 2018-2020 या काळात ते भारताचे परराष्ट्र सचिव म्हणून कार्यरत होते.

या जबाबदारीआधी, जानेवारी 2010 ते ऑक्टोबर 2013 या काळात ते भारताचे मलेशियामधले हाय कमिशनर होते, ऑक्टोबर 2013 ते जानेवारी 2016 या काळात ते जर्मनीतले राजदूत होते आणि जानेवारी 2016 ते ऑक्टोबर 2017 या काळात ते पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनामधले भारताचे राजदूत होते. जुलै 2003 ते जानेवारी 2007 या काळात ते तैवानमध्ये भारत-तैपेइ असोसिएशनचे प्रमुख होते. परराष्ट्र खात्याच्या मुख्यालयात काम करत असताना त्यांनी पूर्व आशिया विभागात महत्त्वाच्या पदांवर काम केले. मार्च 2007 ते डिसेंबर 2009 या काळात त्यांनी सह-सचिव (डायरेक्टर जनरल), पूर्व आशिया या पदावर काम केले.

इन्डो-पॅसिफिक प्रदेशाशी निगडित असलेल्या विषयांवर, त्यातही विशेषकरून चिनी राजकारण आणि मुत्सद्देगिरी यावर त्यांनी विस्तृत काम केलेले आहे. परराष्ट्र सेवेतून निवृत्ती स्वीकारल्यानंतर न्यू यॉर्क टाइम्स, फॉरेन पॉलिसी, द हिंदू, द टाइम्स ऑफ इंडिया आणि इंडियन एक्स्प्रेससारख्या वृत्तपत्रांमधून त्यांनी स्तंभ लिहून आपल्या मतांची मांडणी केलेली आहे. तिआनमेन स्क्वेअर : द मेकिंग ऑफ अ प्रोटेस्ट (हार्परकॉलिन्स इंडिया, मे 2021), द लॉन्ग गेम : हाऊ द चायनीज नेगोशिएट विथ इंडिया (पेंग्विन रॅन्डम हाऊस इंडिया, जुलै 2021) आणि आफ्टर तिआनमेन : द राइज ऑफ चायना (हार्परकॉलिन्स इंडिया, सप्टेंबर, 2022) ही तीन पुस्तकेही त्यांनी लिहिलेली आहेत.

## ऋणनिर्देश

हा लेख आणखी सुधारावा, यासाठी अभ्यासपूर्ण प्रतिक्रिया आणि सल्ले दिल्याबद्दल श्याम सरन, शिवशंकर मेनन, मिक्को हुओतारी आणि रुद्र चौधुरी यांचे लेखक आभार मानतात. संशोधनात सहाय्य केल्याबद्दल ते साहेब सिंग चढ्ढा यांचेही आभार मानतात.

# टिपा


1. Cancian, Mark F., Matthew Cancian, and Eric Heginbotham. “The First Battle of the Next War: Wargaming a Chinese Invasion of Taiwan.” CSIS | Center for Strategic & International Studies, January 9, 2023. https://www.csis.org/analysis/first-battle-next-war-wargaming-chinese-invasion-taiwan.
2. 7 मार्च 2023 रोजी चीनचे परराष्ट्र मंत्री म्हणून घेतलेल्या पहिल्या पत्रकार परिषदेत किन गॅन्ग म्हणाले, की “पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाच्या पवित्र भूमीचा तैवान हा एक भाग आहे. आपली मातृभूमी परत एक करण्याचे मोठे काम करण्यासाठी प्रयत्न करणे तैवानमधल्या आपल्या देशबांधवांसहित समस्त चिनी जनतेचे कर्तव्यच आहे.” पहा मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स ऑफ द पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना. “फॉरेन मिनिस्टर किन गॅन्ग यांची पत्रकारांबरोबर भेट”, 7 मार्च 2023. https://www.fmprc.gov.cn/mfa_eng/zxxx_662805/202303/t20230307_11037190.html.
3. 12 ऑगस्ट, 2022 ला पत्रकारांना केलेल्या अधिकृत कॉलवर अध्यक्षांचे सह-सहायक आणि हिंद-प्रशांतचे समन्वयक कर्ट कॅम्पबेल म्हणाले : “तैवान रिलेशन्स कायद्याअन्वये आम्ही आमची वचने पूर्ण करण्यासाठी कटीबद्ध आहोत. तैवानची सुरक्षा, अर्थव्यवस्था किंवा समाज यांना धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही बळाला किंवा कोणत्याही प्रकारच्या दबावाला आम्ही प्रतिबंध करू, आणि त्यासाठी आम्ही तैवानच्या स्व-प्रतिकारशक्तीला पाठिंबा देण्यासह आमची स्वत:ची क्षमताही कायम राखू.” पहा द व्हाईट हाऊस. “ऑन-द-रेकॉर्ड प्रेस कॉल बाय कर्ट कॅम्पबेल, अध्यक्षांचे सह-सहायक आणि हिंद-प्रशांतचे समन्वयक”, 12 ऑगस्ट, 2022. https://www.whitehouse.gov/briefing-room/press-briefings/2022/08/12/on-the-record-press-call-by-kurt-campbell-deputy-assistant-to-the-president-andcoordinator-for-the-indo-pacific/.
4. “Bridging the Gap: Priorities for Transatlantic China Policy.” Washington, D.C., Berlin, and Munich: Aspen Strategy Group, the Mercator Institute for China Studies, and the Munich Security Conference, February 2023. https://www.aspeninstitute.org/wp-content/uploads/2023/02/ASG-MERICS-MSC-Report-2023- Bridging-the-Gap-final.pdf.
5. “2021 Report to Congress.” Washington, D.C.: U.S.-China Economic And Security Review Commission, November 2021. https://www.uscc.gov/sites/default/files/2021-11/2021_Annual_Report_to_Congress.pdf.
6. Feigenbaum, Evan A., and Adam Szubin. “What China Has Learned From the Ukraine War.” Foreign Affairs, February 14, 2023. https://www.foreignaffairs.com/china/what-china-has-learned-ukraine-war.
7. Blanchette, Jude, and Ryan Hass. “The Taiwan Long Game.” Foreign Affairs, December 20, 2022. https:// www.foreignaffairs.com/china/taiwan-long-game-best-solution-jude-blanchette-ryan-hass.
8. 1960 मध्ये चीनचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न (GDP) ($59.72 बिलियन) हे अमेरिकेच्या GDPच्या सुमारे एक दशमांश ($543.3 बिलियन) होते. 2021 साली चीनचा GDP ($17.73 ट्रिलियन) अमेरिकेच्या GDP च्या ($23.3 ट्रिलियन) जवळपास तीन चतुर्थांश होता. पहा द वर्ल्ड बँक. “GDP (करंट US$)- युनायटेड स्टेट्स । डेटा” 13 मार्च, 2023 रोजी. https://data.worldbank.org/indicator/NY.GDP.MKTP.CD?locations=US “GDP (करंट US$)- चीन https://data.worldbank.org/indicator/NY.GDP.MKTP.CD?locations=CN.
9. Blanchette, Jude, and Ryan Hass. “The Taiwan Long Game.” Foreign Affairs, December 20, 2022. https:// www.foreignaffairs.com/china/taiwan-long-game-best-solution-jude-blanchette-ryan-hass.
10. CBS News. “President Joe Biden: The 2022 60 Minutes Interview,” September 18, 2022. https://www.cbsnews.com/news/president-joe-biden-60-minutes-interview-transcript-2022-09-18/.
